मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३०७ ■ सोमवार, २० जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# पनवेल महापालिकेच्या अवयवदान दिंडीचा महाराष्ट्रभर जागर

## वारकरी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** आषाढी वारीच्या पवित्र सोहळ्यात "अवयवदान हीच खरी जीवनदानाची वारी" हा मानवतेचा संदेश घेऊन मार्गक्रमण करणाऱ्या पनवेल महानगरपालिका व धन्वंतरीज ऑर्गनायझेशन फॉर सोशियो-हेल्थ ट्रान्सफॉर्मेशन (दोस्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अवयवदान व आरोग्य सेवा दिंडीला महाराष्ट्रभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, समाजात अवयवदानाविषयी जनजागृती निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ही दिंडी करत आहे.







पंढरीच्या वारीसोबत मानवतेचा संदेश घेऊन पुढे सरकणाऱ्या या दिंडीद्वारे "अवयवदान हेच श्रेष्ठ जीवनदान" हा संदेश हजारो वारकऱ्यांपर्यंत पोहोचत आहे. दिंडी ज्या-ज्या गावांतून मार्गक्रमण करत आहे, त्या प्रत्येक ठिकाणी नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी होत असून अवयवदानाबाबत माहिती जाणून घेण्यासाठी मोठी गर्दी होत आहे.

सध्या ही दिंडी इंदापूर येथे पोहोचली असून, हजारो वारकरी, नागरिक आणि स्थानिक सामाजिक संस्थांनी दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत केले. अवयवदानाबाबत माहिती जाणून घेण्यासाठी तसेच अवयवदानाचा संकल्प करण्यासाठी वारकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला. दिंडीच्या माध्यमातून आरोग्य जनजागृती, मानवतेचा संदेश आणि समाजहिताची भावना प्रभावीपणे पोहोचत असल्याने सर्व स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

या प्रसंगी पनवेल महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी इंदापूर येथे दिंडीला भेट देऊन सहभागी वारकरी, स्वयंसेवक आणि आयोजकांशी संवाद साधला. त्यांनी दिंडीच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या अवयवदान जनजागृती अभियानाबाबत टीमचे कौतुक करत हा उपक्रम समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

दररोज हजारो वारकऱ्यांच्या संपर्कात येत असलेली ही दिंडी अवयवदानासारख्या संवेदनशील विषयाला लोकचळवळीचे स्वरूप देत आहे. वारीच्या अध्यात्मिक वातावरणातून "मृत्यूनंतरही जीवनदान" हा संदेश प्रभावीपणे जनमानसापर्यंत पोहोचत असून, अनेक वारकरी व नागरिक अवयवदानाविषयी सकारात्मक भूमिका व्यक्त करत आहेत.

पनवेल महानगरपालिकेच्या या अभिनव उपक्रमाची राज्यभर चर्चा होत असून, विविध सामाजिक संस्था, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांकडून या अभियानाचे विशेष कौतुक केले जात आहे. अवयवदान जनजागृतीचा संदेश पंढरीच्या वाटेवरून प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचा पनवेल महानगरपालिकेचा हा उपक्रम सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

**पनवेलच्या नेतृत्वातून अवयवदानाचा संकल्प; जनजागृती अभियानाला मिळाली प्रेरणादायी सुरुवात**

या जनजागृती अभियानाची सुरुवात 2 जुलै रोजी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील आणि महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते अवयवदानाचा संकल्प करून करण्यात आली होती. समाजात अवयवदानाबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण करण्याचा दृढ निर्धार व्यक्त करत त्यांनी या अभियानाला शुभारंभ केला. त्यांच्या प्रेरणेतून सुरू झालेली ही अवयवदान दिंडी आज महाराष्ट्रभर जनजागृतीची प्रभावी चळवळ ठरत असून, वारकरी संप्रदायासह सर्वसामान्य नागरिकांकडून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पनवेल महानगरपालिकेने घेतलेला हा अभिनव पुढाकार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रेरणादायी ठरत असून, मानवतेचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वत्र कौतुकाचा विषय बनला आहे.

### पनवेल महानगरपालिकेची आरोग्यसेवा

- 2 जुलै रोजी अवयवदान व आरोग्य सेवा दिंडी 2026 चा भव्य प्रस्थान सोहळा पार पडला.
- दिनांक नऊ जुलै 2026 रोजी 30 जणांचा चमू वारी मध्ये सहभागी होण्यासाठी रुजू झाला.
- अवयवदान या विषयावर आधारित पथनाट्य 55 ठिकाणी सादर करण्यात आले.
- वारकऱ्यांसाठी 14 ठिकाणी आरोग्य सेवा शिबिरांचे आयोजन करण्यात आले त्यातुन 6984 जणांना औषधी वाटप करून आरोग्यसेवा दिली .
- वारकऱ्यांसाठी 6 ठिकाणी चरण सेवा शिबिरांचे आयोजन करण्यात आले त्यातुन 790 जणांना चरणसेवेचा लाभ देण्यात आला तसेच, विविध दिंड्यांमधील वारकऱ्यांसाठी तेलाचे वाटप करण्यात आले.
- अवयवदान विषयक माहिती पत्रक सर्वच ठिकाणी वाटण्यात आले 8000 माहिती पत्रांचे वाटप करण्यात आले.
- बारामती येथे स्थानिक आय एम ए च्या सहकार्याने वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांसाठी अवयवदान व नॉन ट्रान्सप्लांट ऑर्गन रिट्रीव्हल सेंटर सक्षमीकरण या विषयावर व्याख्यान देण्यात आले.

# पनवेलमध्ये SIR मॅपिंग शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** मतदार यादी शुद्धीकरण अभियानांतर्गत संघमित्रा सोसायटी, मॉडर्न स्वीट्स समोर, पनवेल येथे आमदार विक्रांतदादा पाटील जनसेवा कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या SIR मॅपिंग शिबिराच्या पहिल्याच दिवशी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.






शॉप क्र. २२ येथील जनसेवा कार्यालयात आयोजित या शिबिरामध्ये मतदार यादीतील नाव कायम राहावे

प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा हक्क सुरक्षित राहावा तसेच मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक व अद्ययावत व्हावी या उद्देशाने नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून SIR मॅपिंगची प्रक्रिया पूर्ण केली.शिबिरादरम्यान नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले तसेच प्रक्रिया सुलभ आणि जलद पद्धतीने पार पडावी यासाठी कार्यकर्त्यांनी विशेष सहकार्य केले.

पहिल्याच दिवशी लाभलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आगामी दिवसांमध्येही मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

नागरिकांचा हा उत्स्फूर्त सहभाग लोकशाहीप्रती असलेली त्यांची जागरूकता, मतदानाच्या अधिकारा विषयीची बांधिलकी आणि जबाबदारी अधोरेखित करणारा असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# दिंडी चालली चालली... विठ्ठलाच्या दर्शनाला

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई:** आषाढी एकादशी वारीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील कोपरखैरणे गावातील श्री विठ्ठल रखुमाई सेवा वारकरी मंडळाच्या वारकऱ्यांच्या भक्तिमय उत्साह यंदा ही पाहायला मिळत आहे.गेल्या २८ वर्षांपासून कोपरखैरणे तुन दिडींचालक- ह.भ.प श्री.सोपान( महाराज )आदितवार म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली दिडींचे भजन चालक ह.भ.प श्री .ज्ञानराज महाराज म्हात्रे कोपरखैरणे यांच्या समवेत पायी पंढरपूर वारी करत आहेत.या वारीत युवकांनचा उत्स्फूर्त असा सहभाग विशेष लक्षवेधी ठरत आहे.ज्येष्ठ वारकऱ्यांसोबत मोठ्या संख्येने युवा वर्गही विठ्ठल नामाचा गजर करत पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे.या काही दिवसांपूर्वी नुकतेच श्री नर्मदा परिक्रमा करणारे किर्तनकार ह.भ.प श्री.विशाल महाराज



पाटील कोपरी तसेच पखवाज वादक - कु.ह.भ.प धनंजय रामेश्वर वेटा यांच्या समवेत सोपान महाराज म्हात्रे, ज्ञानराज महाराज म्हात्रे, नकुल महाराज, नामदेव महाराज ( विणेकरी),विशाल महाराज, धनंजय महाराज, धनुर्धर महाराज, पुंडलिक महाराज, राजेंद्र मोरे,राम हिवसे, दीपक महाराज,रामेश्वर वेटा , संतोष, रवींद्र, पांडुरंग, धर्मेंद्र, ऋषिकेश ठाकूर, माऊली ठाकुर ( पखवाज वादक),जय हरी, तसेच महीला वारकरी सामील झालेल्या महींद्रा म्हात्रे,गीता वेटा , कामिनी, वैशाली,मेघा, लक्ष्मी, ऋतुजा,मन्थना, पार्वती धपाटे,पदमा, इंदुबाई,हेमा ,कु.भवित देवेंद्र पाटील ( युवा वारकरी) यांच्या अन्य देखील वारकरी सहभागी झाले आहेत.टाळ-मृदुंगाच्या निनाद , हरिनामाचा गजर आणि विठ्ठलभक्ती च्या वातावरणात ही पायी वारी पुढे सरकत असुन नवी मुंबईतील -: कोपरखैरणे येथील वारकरी परंपरा अधिक बळकट होत असल्याचे चित्र दिसत आहे.युवकांच्या वाढत्या सहभागामुळे वारकरी संप्रदायाची परंपरा अशीच पुढील पिढीपर्यंत पोहचण्यास निश्चितच हातभार लागणार असल्याची भावना वारकरी व्यक्त करत आहेत.अशी माहीती ग्रामस्थ अविनाश भरत पाटील यांनी दिली.




# इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन(ॲन्टीपायरसी सेल) मुंबई तर्फे जितू गुप्ता यांच्या संकल्पनेतून खारपाले शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**गडब प्रतिनिधी- गुरुनाथ तिरपणकर :** खारपाले,ता.पेण येथील अति दुर्गम भागातील शाळेत ॲन्टीपायरसी सेल चे मुख्य तपासी अधिकारी राम जित(जितू) गुप्ता यांच्या संकल्पनेतून खारपाले येथील शाळेतील मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. जितू गुप्ता सर तळागाळातील गरीब गरजू सर्व सामान्य व्यक्तींना नेहमीच मदत करत असतात, महाराष्ट्र विविध ठिकाणी जितू गुप्ता सर यांचे सामाजउपयोगी उपक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाले आहेत. रामजित(जितू) गुप्ता यांनी रायगड जिल्ह्यातील खारपाले गावातील जि.प.प्राथमिक शाळेला भेट देऊन सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य




प्रदान करुन सत्कार केला.दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचिही यावेळी सत्कार करण्यात आला. पुढील वर्षी सर्वात जास्त गुण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सायकल भेट देण्याचे आश्वासन दिले आहे.सर्व प्रथम शाळेतील मुलांनी इशस्तवन सादर करुन मोठ्या उत्साहात स्वागत केले.गुप्ता सरांच्या या संकल्पनेतून मुलांमध्ये अभ्यासू वृत्ती निर्माण होऊन ते अधिक गतिमान जीवन घडवून आपापल्या कला कौशल्यांना वाव देण्यासाठी प्रयत्न करतील व त्यांना लागणाऱ्या यापुढे कोणत्याही प्रकारच्या गरजू शैक्षणिक वस्तू देण्याचे ठरविले आहे.तसेच शाळेतील सभागृहासाठी त्वरित चार फॅन देण्याचे कबूल केले. खारपाले येथील या प्राथमिक शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर,समाजसेविका राजकुमारी रामजित गुप्ता, समाजसेवक उत्तम भिकाजी बंगाले,समाजसेविका मनीषा गोडसे, कुसुम चोबे, राजेश कोठेकर, अनंत चवरकर(ABC) रायगड शानच्या संपादिका अवंतिका म्हात्रे, सरपंच कविता गावंड, उपसरपंच पांडुरंग तुरे, सदस्य सुवर्णा कडू, महादेव चायाभोईर हे उपस्थित होते.या सर्व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

तसेच याप्रसंगी समाजसेविका सौ.शैला प्रमोद तुरे यांना इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शनच्या वतीने "रायगड कन्या"पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला खारपाले गावातील शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मुख्याध्यापक मोकल सर यांनी केले.

शेवटी सौ.शैला तुरे यांच्या निवासस्थानी सुग्रास भोजनाचे कार्यक्रमाची सांगता झाली.

# घनसावंगी तालुक्यात पिकासाठी उत्तम पाऊस, मात्र तहान अजूनही बाकीच!

**दैनिक युवक आधार**

**घनसावंगी-(एकनाथ जाधव) :** मान्सूनने घनसावंगी तालुक्यावर कृपा केली आहे. गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हावभाव दिसत आहेत. सोयाबीन, कापूस, तूर आणि मूगाच्या पिकांनी माना वर काढल्या असून, शेतात हिरवळ दाटली आहे. पेरण्या जवळजवळ 90 टक्के पूर्ण झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.पण याच हिरवळी आड एक मोठं वास्तव दडलंय.शेती हिरवी झाली तरी गावाची तहान अजून भागलेली नाही.

पिकं तरली, पण विहिरी अजूनही तळाला आहेत. घनसावंगी तालुक्यात आतापर्यंत अधून मधून पाऊस झाला आहे,जो पेरणीसाठी आणि पिकांच्या वाढीसाठी उत्तम मानला जातोय. शेतकरी राजा या मुळे सुखावला आहे.

मात्र दुसरीकडे चित्र वेगळं आहे. घनसावंगी तालुक्यातील अनेक लहान-मोठे तलाव, बंधारे अजूनही रिकामेच आहेत. मोठा पाऊस झाला पण वाहून गेला, जमिनीत मुरलाच नाही, अशी



शेतकऱ्यांची भावना आहे. विहिरींनी तळ गाठला आहे. भूजल पातळी अजूनही 400 फुटांच्या खालीच आहे. नवीन बोअरवेल घेणाऱ्यांच्या पदरी निराशाच पडत असल्याचे एका ज्येष्ठ शेतकऱ्याने सांगितले आहे ."पाऊस पडला, पिकं जगतील, पण आमच्या लेकराबाळांच्या पिण्याच्या पाण्याचं काय?जोपर्यंत दोन-तीन मुसळधार पाऊस होऊन बंधारे भरत नाहीत, तोपर्यंत खरी ओल मानता येणार नाही."थोडक्यात, घनसावंगीसाठी हा पाऊस 'शेतीसाठी दिलासा आणि तहानेसाठी अजून प्रतीक्षा' असाच ठरला आहे.

# खानावमध्ये शेकापचा 'बुरुज' ढासळला;

## पाटील कुटुंबाच्या भाजप प्रवेशाने पनवेलच्या ग्रामीण राजकारणाला नवी कलाटणी!

### कामगार नेते प्रभुदास भोईर यांची मोठी राजकीय खेळी; खानावमध्ये भाजपची ताकद वाढली!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** तालुक्यातील ग्रामीण राजकारणाचा केंद्रबिंदू असलेल्या खानाव गावात शेतकरी कामगार पक्षाला (शेकाप) आतापर्यंतचा सर्वात मोठा धक्का बसला आहे. गेली ५० ते ६० वर्षे, म्हणजेच थेट आजोबा-पणजोबांच्या काळापासून शेकापशी एकनिष्ठ राहिलेल्या खानाव येथील प्रतिष्ठित पाटील घराण्याने अखेर लाल बावट्याला रामराम ठोकत भारतीय जनता पक्षाचा झेंडा हाती घेतला आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत ५० लोकांच्या या संपूर्ण संयुक्त परिवाराने भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला असून, यामुळे तालुक्यातील राजकीय गणिते पूर्णपणे बदलली आहेत.

खानाव गावातील या मोठ्या



राजकीय भूकंपामागे भाजपचे धडपडे कामगार नेते प्रभुदास अण्णा भोईर यांची अचूक रणनीती यशस्वी ठरली आहे. गेल्या १ ते २ वर्षांपासून त्यांनी पाटील कुटुंब आणि गावातील तरुण वर्गाशी सातत्यपूर्ण संवाद ठेवून हा 'मास्टरस्ट्रोक' खेळला. वर्षानुवर्षे पक्षासाठी एकनिष्ठेने राबूनही शेकापने कधीही योग्य न्याय दिला नाही, अशी खंत यावेळी पाटील कुटुंबाने व्यक्त केली. गावात होत असलेली विकासकामे आणि तरुण पिढीचे भवितव्य डोळ्यांसमोर ठेवूनच हा ऐतिहासिक निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या भव्य पक्षप्रवेश सोहळ्यात ज्येष्ठ नेते भाऊशेठ पाटील, माजी सरपंच दत्तात्रेय पाटील, माजी उपसरपंच ताईबाई पाटील यांच्यासह दिनेश पाटील, जगदीश पाटील, पुंडलिक पाटील व विठ्ठल पाटील या तरुण कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत करण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामगार नेते प्रभुदास भोईर यांच्या संघटन कौशल्याचे कौतुक करत हा भाजपसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे सांगितले, तसेच पाटील कुटुंबाला पक्षात योग्य मानसन्मान, प्रतिष्ठा आणि न्याय देण्याचा जाहीर शब्द दिला. या ऐतिहासिक पक्षप्रवेशामुळे खानाव आणि परिसरात भाजपची ताकद कमालीची वाढली असून शेकापचा बालेकिल्ला मात्र पुरता ढासळला आहे.

# भटक्या श्वानाच्या हल्ल्यात जखमी सनिधीची आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी घेतली भेट; उपचारांचा घेतला आढावा

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका अमरावती, :** अमरावतीतील रुख्मिणी नगर परिसरात भटक्या श्वानाच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या १० वर्षीय सनिधी सचिन कावरे हिची आज आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये भेट घेऊन तिच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. यावेळी विधान परिषद आमदार संजय खोडके हेही उपस्थित होते.रुख्मिणी नगर येथील साई हॉस्पिटलजवळ अंगणात खेळत असताना भटक्या श्वानाने सनिधीवर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात ती गंभीर जखमी झाल्यानंतर तिला तातडीने सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दाखल



करण्यात आले. तिच्यावर प्लास्टिक सर्जन डॉ. सागर भुतडा यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली असून सध्या आयसीयूमध्ये तिच्यावर उपचार सुरू आहेत.रुग्णालय भेटीदरम्यान आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी तसेच वैद्यकीय पथकाशी सविस्तर चर्चा केली. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे आणि सर्जन डॉ. विक्रांत कुळमेथे यांनी सनिधीच्या प्रकृतीविषयी माहिती देताना, तिची प्रकृती स्थिर असून सुधारणा होत आहे. ती वैद्यकीय तज्ज्ञांच्या २४ तास निगराणीखाली असल्याचे सांगितले. यानंतर आमदार सौ. खोडके यांनी सनिधीची आई सौ. दीपा कावरे व वडील सचिन कावरे यांची भेट घेऊन संपूर्ण घटनाक्रम जाणून घेतला. सनिधी ही अमरावतीतील विद्यानिकेतन शाळा, रामनगर येथील तिसरी इयत्तेची विद्यार्थिनी असून, खेळत असताना झालेल्या या दुर्दैवी घटनेमुळे कुटुंबावर मोठे संकट कोसळल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. या प्रसंगी आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी रुग्णालय प्रशासनाला सनिधीला सर्व अत्यावश्यक व अतिविशिष्ट वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या सूचना दिल्या. उपचारात कोणतीही कमतरता राहू नये आणि मुलीला सर्वोत्तम वैद्यकीय सेवा मिळावी, यासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी कुटुंबीयांना दिले.दरम्यान, या घटनेमुळे शहरातील भटक्या श्वानांच्या वाढत्या उपद्रवाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. अशा घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पनवेल शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांकडून मानवतेचे दर्शन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भालचंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अभिमन्यू लाळगे व प्रदीप चव्हाण यांनी कर्तव्याबरोबरच सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून दिले.

जेएनपीटी ते पनवेलकडे जाणाऱ्या साई वर्ल्ड सिटी मार्गावर एक अनोळखी इसम मुसळधार पावसात भिजून रस्त्यावर बेशुद्ध अवस्थेत पडल्याची माहिती मिळताच दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

त्यांनी सदर इसमाला सुरक्षितपणे रस्त्याच्या बाजूला हलवून वाहतुकीस कोणताही अडथळा



होणार नाही याची खबरदारी घेतली.

त्यानंतर तातडीने रुग्णवाहिका बोलावून संबंधित इसमाला उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे उपचारासाठी पाठविण्यात आले. पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी त्या इसमास पनवेल शहर पोलीस ठाणे, बिट मार्शल क्रमांक ४ यांच्या ताब्यात देण्यात आले.

वेळीच दाखविलेल्या तत्परतेमुळे एका अनोळखी नागरिकाचा जीव वाचविण्यास मोठी मदत झाली. पनवेल शहर वाहतूक शाखेच्या या संवेदनशील आणि तत्पर कार्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ आणि सरकारच्या दडपशाहीविरोधात पनवेल येथील संविधान कट्ट्यावर निदर्शने

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे NEET पेपर लीक, परीक्षा प्रणालीतील गैरव्यवहार आणि शिक्षणव्यवस्थेतील भ्रष्टाचार प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी उपोषण करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ व त्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी, तसेच सरकारच्या दडपशाहीविरोधात 'संविधानप्रेमी नागरिक, पनवेल–नवी मुंबई' यांच्या वतीने निदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

हे निदर्शन शनिवार, १८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता संविधान कट्टा, नेशनल बँकेजवळ, सेक्टर १३, खांदा कॉलनी, पनवेल येथे पार पडले.

सोनम वांगचुक गेल्या २० दिवसांपासून NEET परीक्षेतील गडबडी, वारंवार पेपर लीक आणि राष्ट्रीय परीक्षा प्रणालीतील पारदर्शकतेच्या अभावाविरुद्ध दिल्लीत उपोषणावर आहेत. १८ जुलै रोजी त्यांना पोलिसांनी जंतर-मंतरवरून जबरदस्तीने हलवून रुग्णालयात दाखल केले, ज्यामुळे देशभरात संताप व्यक्त केला जात आहे.



सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा देणे, परीक्षा प्रणालीतील सुधारणांची मागणी करणे आणि शांतिपूर्ण लोकशाही आंदोलनाच्या हक्काचे रक्षण करणे, या उद्देशाने हे निदर्शन आयोजित करण्यात आले होते.

या वेळी उपस्थित सर्वहरा जनआंदोलनाच्या उल्का महाजन यांनी RSS आणि BJP च्या कार्यपद्धतीवर बोलताना सांगितले की, "भूक, भीती, भ्रम, भेद, भिक आणि भ्रष्टाचार या मार्गाने सत्ता स्थापन करून देशातील लोकशाही धोक्यात आणली आहे."

स्थानिक नागरिक, युवक, विद्यार्थी, पालक आणि सर्व सामाजिक संघटनांनी या निदर्शनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन शांतिपूर्ण मार्गाने आंदोलन केले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (MANS), AISF , संविधान प्रचारक, सत्यशोधक विद्यार्थी परिषद, माहिती अधिकार महासंघाचे कार्यकर्ते आणि विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

उपस्थितांनी या सरकारच्या दडपशाहीविरोधात पुढेही संविधानिक मार्गाने आंदोलन करण्याचा संकल्प केला. तसेच याबाबत राष्ट्रपतींकडे निवेदन देण्याचाही निर्णय घेण्यात आला.

यावेळी कळंबोली वाहतूक पोलिस आणि खंडेश्वर पोलिसांनी विशेष सहकार्य केले. या निदर्शनाच्या आयोजनासाठी सुवर्णा सावंत यांनी विशेष योगदान दिले.

# इर्शाळगडप्रबळगड दरम्यान भरकटलेल्या 13 ट्रेकर्सची थरारक सुटका

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** इर्शाळगडावरून माची प्रबळगडाच्या दिशेने ट्रेकसाठी निघालेल्या, आणि घनदाट जंगलात भरकटून अडकून पडलेल्या, ठाण्यातील 13 तरुणांची अखेर सुटका करण्यात आली आहे. स्थानिक पोलीस आणि स्थानिक बचाव पथकानी शोध मोहीम राबवून सर्व मला सुखरूप बाहेर काढले आहे.

अंधार पडू लागलेला, मोबाईल नेटवर्क जवळपास बंद, खोल दऱ्या, निसरडे कातळ आणि जीवघेण्या वाटांमुळे ट्रेकर्स गंभीर संकटात सापडले. अखेर आपत्कालीन 112 क्रमांकावर मदतीचा कॉल प्राप्त होताच तातडीने बचाव मोहीम हाती घेण्यात आली.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट मार्शल-4 वरील नितीन सोनवणे व प्रदीप पोपटे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्यासोबत माची प्रबळ गावातील अनुभवी वाटाडे नवनाथ पारधी, हरिश्चंद्र पारधी व नथुराम पारधी, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे 3 अधिकारी व 7 पोलीस अंमलदार, निसर्ग मित्र संस्था, पनवेलचे



सचिन शिंदे, वरद पवार, हेमंत वैद्य व अक्षय देशमुख, तसेच हेल्प फाउंडेशनचे रेस्क्यूअर्स बचाव मोहिमेत सहभागी झाले. रात्र वाढत असताना दाट जंगलातून मार्ग काढणे हे मोठे आव्हान होते. अनेक ठिकाणी एका चुकीच्या पावलाने शेकडो फूट खोल दरीत कोसळण्याचा धोका होता. मात्र बचाव पथकाने स्वतःचा जीव धोक्यात घालत शोधमोहीम सुरू ठेवली. अनेक तासांच्या अथक प्रयत्नांनंतर भरकटलेल्या ट्रेकर्सपर्यंत पोहोचून त्यांना सुरक्षित मार्गाने एकामागोमाग एक खाली आणण्यात यश आले.

या मोहिमेत सुखरूप बचाव करण्यात आलेल्या ट्रेकर्समध्ये आदित्य अशोक विचारे, प्रकाश संतोष सावंत, यतीन कालिया, ऋतुराज सदाशिव पाटील, अंकित मिश्रा, दीपक उत्तम बनकर, अभिषेक जयप्रकाश बहादूरकर, दीपक कुमार राजदेव महतो, अनिकेत दुबे, चेतन शिंदे, राहुल बनकर, प्रशांत पांचोरे आणि रोहित कुमार यांचा समावेश आहे. हे सर्वजण ठाणे येथील टीसीएस कंपनीत कार्यरत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

वेळीच मिळालेल्या मदतीमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली. या धाडसी संयुक्त बचाव मोहिमेत पनवेल तालुका पोलीस, स्थानिक वाटाडे, निसर्ग मित्र संस्था आणि हेल्प फाउंडेशनच्या रेस्क्यूअर्सनी जीवाची पर्वा न करता काम केल्याने सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे. अनोळखी ठिकाणी माहीतगार सोबत असल्याशिवाय पावसाळी गिरी भ्रमंती टाळावे असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# उरण पोलिसांची कामगिरी कौतुकास्पद; मात्र दारूबंदी राज्य उप्तादनशुक्ल अधिकारी अर्थपूर्ण निद्रेत?

## द्रोणागिरीत अवैध दारूचा 36 हजारांचा मुद्देमाल जप्त, एकाला अटक

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** दि. 13/07/2026 रोजी रात्री 9.10 वाजता सेक्टर उरण येथील 59, द्रोणागिरी,सेक्टर 59 येथील एका कंटेनरमध्ये सुरु असणाऱ्या द्रोणागिरी ढाब्यात एक इसम हा बेकायदेशीररित्या दारू विक्री करत असल्याची माहिती उरण पोलिसांच्या गुन्हे विभाग शाखेतील किशोर तुकाराम पाटील यांना मिळाली असता त्या माहितीच्या आधारे उरण पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेने धडक कारवाई करीत द्रोणागिरीतील एका कंटेनरमध्ये सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीच्या अड्ड्यावर 14 जुलै 2026 तातडीने कारवाई करून छापा टाकला; मुंबई दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करीत पोलिसांनी 36,559 रुपयांच्या दारू साठा आणि काही रोख रक्कम जप्त केली असूनया प्रकरणी आकाश बॉबीलाल खनालयाला अटक करण्यात आली आहे.पोलिसांनी घटनास्थळावरून विविध ब्रँडच्या दारूच्या बाटल्या जप्त केल्या आहेत. त्यात मॅकडॉल नंबर 9 विस्की, रॉयल चॅलेंज विस्की, इम्पीरियल ब्लू, रॉयल ग्रीन, मॅकडॉल रम, मॉन्स्टर डिलाईट, रुस्तम गोल्ड रम, किंगफिशर स्ट्राँग बियर, कॅसल बर्ग बियर, टर्बो स्ट्राँग बियर, कांगारू 9000 बियर, एलबी स्ट्राँग बियर, डी.जी. एम दारू अशा एकूण 17 प्रकारच्या 180 मिलीलिटर ते 650 मिलीलिटरच्या शेकडो सिलबंद बाटल्यांचा समावेश आहे. या संदर्भात पोलिसनी केलेल्या पंचनाम्यात 790 रुपयांची रोख रक्कम देखील पोलिसांनी जप्त केली असून आहे. जप्त करण्यात आलेल्या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत 36,559 रुपये इतकी आहे. या प्रकरणी मुंबई दारूबंदी कायदा कलम 65 (ई) अन्वये उरण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 249/2026 दाखल करण्यात आला असून आकाश बॉबीलाल खनाल वय 27 वर्षे राहणार सेक्टर 50, स्काय व्हिला बिल्डिंग, उरण रायगड याला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 35(3) अन्वये नोटीस देऊन ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास स.पो.नि. संजय राठोड करीत आहेत. उरण परिसरात व द्रोणागिरी शहरात अनेक दिवसांपासून अवैध दारू विक्रीचे प्रकार वाढले आहेत. पोलीस प्रशासनाने केलेली ही कारवाई कौतुकास्पद असली तरी इतकी मोठी कारवाई होत असताना घटना स्थळा पासून केवळ 2 की.मी.च्या परिसरात दारूबंदी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी अर्थपूर्ण साखर झोपेत असल्याने नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त होत असताना नागरिकांनी अशा अड्ड्यांवर कायमस्वरूपी आळा बसवावा जेणेकरून तरुणाई व्यसनाधीन होण्यापासून वाचेल आशी मागणी केली आहे

# जि.प.प्रा.शाळा रुई नालकोल च्या वतीने आनंददायी शनिवार हा उपक्रम राबविण्यात आला

**दैनिक युवक आधार**

**आष्टी मराठवाडा संपर्कप्रमुख मारुती सत्रे :** आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी दप्तरमुक्त शनिवार उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक देविदास गांजुरे सर,मनोहर गांजुरे सर,शेख नगीना मॅडम,विद्यार्थ्यांना निसर्गा विषयी सखोल माहिती देत

दावल मलिक मंदिराची संपूर्ण स्वच्छता केली, विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेट देऊन परिसराची पाहणी केली तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी विविध प्रकारच्या वृक्षांच्या बियांचे रोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्त्व, जैवविविधतेचे संवर्धन आणि निसर्गाचे जतन करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यानंतर सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि उपस्थितांनी निसर्गरम्य वातावरणात



वनभोजनाचा आनंद घेतला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली तसेच निसर्गाशी मैत्री करण्याची प्रेरणा मिळाली. आनंददायी शनिवार उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

# स्वच्छ श्रीवर्धन, हरित श्रीवर्धन

## जनसहभागातून पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश




**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : श्रीवर्धन शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने श्रीवर्धन नगरपरिषदेच्या वतीने रविवारी (दि. १९ जुलै २०२६) "सफाई अपनाओ, बिमारी भगाओ" अभियानांतर्गत समुद्रकिनारी भव्य स्वच्छता मोहीम, जनजागृती रॅली आणि "Catch the Rain" उपक्रमाअंतर्गत जलसंवर्धनाची सामूहिक शपथ उत्साहात पार पडली.

या उपक्रमाद्वारे स्वच्छता, जलसंवर्धन, 'माझी वसुंधरा' अभियान तसेच ब्लू फ्लॅग बीच संकल्पनेचे महत्त्व विद्यार्थी, नागरिक आणि पर्यटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आले. स्वच्छ पर्यावरण ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला.

या अभियानात नगराध्यक्ष अतुल चौगुले, उपनगराध्यक्ष अनंत गुरव, मुख्याधिकारी अवधूत कुंभार, स्वच्छता व पाणीपुरवठा अभियंता पांडुरंग इंगळे यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी, र. ना. राऊत हायस्कूल तसेच नगरपरिषद शाळांतील शिक्षक, विद्यार्थी आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले.

सुमारे २०० ते २५० स्वयंसेवकांच्या सहभागातून श्रीवर्धन समुद्रकिनारा आणि परिसरातून अंदाजे २ टन कचरा संकलित करण्यात आला. प्लास्टिक व इतर टाकाऊ वस्तू वेगळ्या करून योग्य विल्हेवाटीसाठी पाठविण्यात आल्या.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्वच्छ शहर, जलस्रोतांचे संवर्धन आणि पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने सातत्याने पुढाकार घेण्याचे आवाहन केले. केवळ शासकीय यंत्रणेवर अवलंबून न राहता नागरिकांच्या सक्रिय सहभागातूनच 'स्वच्छ श्रीवर्धन, हरित श्रीवर्धन' हे उद्दिष्ट प्रत्यक्षात साकार होऊ शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# शाळा–पालक समन्वयाला नवी दिशा; मविप्र सनराईज स्कूलमध्ये पालक–शिक्षक संघाची स्थापना

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : मराठा विद्या प्रसारक समाजाच्या मविप्र सनराईज स्कूल, वडनेर भैरव येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी पालक-शिक्षक संघ (पीटीए) व पालक-शिक्षक कार्यकारिणी समितीची स्थापना उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शासकीय निकषानुसार लकी ड्रॉ पद्धतीने समिती सदस्यांची निवड करण्यात आली. या उपक्रमातून शाळा, पालक आणि शिक्षक यांच्यातील समन्वय अधिक दृढ करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व विद्यार्थीकेंद्रित शिक्षण देण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष इंजि. पोपटराव पाचोरकर होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी इंजि. पाचोरकर, शाळेचे प्राचार्य ज्ञानेश्वर ढिकले, माजी पीटीए उपाध्यक्ष ॲड. प्रमोद गांगुर्डे, ॲड. नवनाथ आहेर आणि विलास भवर यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी शालेय समिती सदस्य इंजि. चंद्रशेखर जाधव, संजय भालेराव, संपत वक्ते, दीपक पाचोरकर, दिलीप सलादे, आनंदा पवार यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्य ज्ञानेश्वर ढिकले यांनी प्रास्ताविकातून पालक-शिक्षक संघाचे महत्त्व, शाळेच्या प्रगतीतील त्याची भूमिका आणि पालकांच्या सहभागाची गरज यावर सविस्तर मार्गदर्शन केले.



यानंतर लकी ड्रॉ पद्धतीने पालक-शिक्षक कार्यकारिणी समितीची निवड जाहीर करण्यात आली. समितीच्या पदसिद्ध अध्यक्षपदी प्राचार्य ज्ञानेश्वर ढिकले, उपाध्यक्षपदी सर्जेराव भालेराव, सचिवपदी चारुशीला रिकामे, तर सहसचिवपदी देवयानी सुहास आल्पे, सदाशिव कोठुळे आणि रूपाली पाटील यांची निवड करण्यात आली.

नर्सरी ते इयत्ता दहावीपर्यंतच्या वर्गांसाठी पालक प्रतिनिधी म्हणून शुभांगी वडनेरे, आकाश धारराव, अक्षय पाटोळे, पूजा निखाडे, प्रणिता थेटे, सचिन वाटपाडे, रोशनी पाचपिंडे, नीता निफाडे, योगिता निकम, संदीप आहेर, नवनाथ निफाडे, सुवर्णा गायकवाड आणि किरण थोरात यांची निवड झाली.

तसेच शिक्षक प्रतिनिधी म्हणून शारदा गवांदे, कांचन पाटील, सोनाली जाधव, सुरेखा मंडलिक, वर्षा बनकर, शालन पाटील, हेमलता काठे, आशा वाघ, पूजा गायकवाड, सारिका चित्ते, श्वेता माळोदे आणि मंगल भालेराव यांची निवड करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात इंजि. पोपटराव पाचोरकर यांनी पालक, शिक्षक आणि शाळा यांच्यातील सुसंवाद, विश्वास व सहकार्य हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रमुख आधारस्तंभ असल्याचे सांगितले. नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकारी व सदस्यांचे अभिनंदन करून विद्यार्थीकेंद्रित शिक्षणासाठी सर्वांनी एकदिलाने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्राचार्य ज्ञानेश्वर ढिकले यांनी मार्गदर्शन करताना पालक-शिक्षक संघ हा शाळेच्या प्रगतीचा महत्त्वाचा दुवा असल्याचे नमूद केले. पालकांचा सक्रिय सहभाग, शिक्षकांचे समर्पण आणि शाळेचे नियोजनबद्ध कार्य यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, बौद्धिक आणि सामाजिक विकास अधिक प्रभावीपणे साधता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी नवनिर्वाचित पालक व शिक्षक प्रतिनिधींचा मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात सर्व पदाधिकारी व सदस्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारिका चित्ते, जया कुशारे आणि मीनाक्षी मोरे यांनी केले, तर रूपाली वानले यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चारुशीला रिकामे, जया कुशारे आणि गीता गावांदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास शालेय समिती सदस्य, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या कार्यकारिणीच्या स्थापनेमुळे शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, पालकांचा सहभाग आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास अधिक बळकट होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# राष्ट्रवादीच्या दणक्याला मोठे यश! आंबेत–म्हाप्रळ पूल प्रकरणी अखेर बार्ज मालकावर गुन्हा दाखल; बार्जचा पंचनामाही पूर्ण

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : सावित्री खाडीवरील आंबेत-म्हाप्रळ पुलाला धडक देऊन हजारो नागरिकांची गैरसोय करणाऱ्या बेजबाबदार बार्ज मालकावर अखेर मंडणगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरदचंद्र पवार) रायगड जिल्हा संघटक तथा श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष अझहर धनसे यांनी दिलेल्या '२८ जुलैच्या अल्टिमेटम' आणि सततच्या धडक पाठपुराव्यामुळे प्रशासनाला ताळ्यावर यावे लागले. शुक्रवारी (१७ जुलै) गुन्हा दाखल झाल्यानंतर, शनिवारी (१८ जुलै) सदर बार्ज शोधून त्याचा रितसर पंचनामाही करण्यात आला आहे. या कारवाईमुळे रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



## अझहर धनसे यांच्या आक्रमक पाठपुराव्यामुळे प्रशासनाला जाग; सावित्री नदीपात्रात चुकीचे काम करणाऱ्यांना कडक इशारा..

पुलाचे नुकसान करणाऱ्यांवर कारवाईसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने १६ जुलै रोजी म्हसळा येथे आमरण उपोषण पुकारण्यात आले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाने (PWD) कारवाईची लेखी हमी दिल्यानंतर हे उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. मात्र, बांधकाम विभागाने तक्रार देऊनही मंडणगड पोलिसांनी सुरुवातीला गुन्हा नोंदवून घेण्यास नकार दिला होता. याचा सविस्तर अहवाल सा.बां. विभागाने अझहर धनसे यांना दिल्यानंतर, पक्षाने अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला. "येत्या २८ तारखेपर्यंत गुन्हा दाखल न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडू," असा खणखणीत इशारा देण्यात आला. या सततच्या दडपणानंतर प्रशासनाने वेगाने सूत्रे हलवली आणि १७ जुलै रोजी मंडणगड पोलीस ठाण्यात रितसर गुन्हा दाखल करून घेत १८ जुलै रोजी बार्जचा पंचनामा केला.

या मोठ्या यशाबद्दल बोलताना अझहर धनसे म्हणाले की, "हे यश केवळ आमच्या पक्षापुरते मर्यादित नसून, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील तमाम जनतेचा हा विजय आहे. दोन्ही जिल्ह्यांतील हजारो नागरिकांनी आमच्यावर जो विश्वास दाखवला, त्या खंबीर साथीमुळेच आम्ही ही आक्रमक भूमिका घेऊ शकलो."

यावेळी धनसे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचेही त्यांच्या सकारात्मक सहकार्याबद्दल आभार मानले आणि पोलीस प्रशासनाने आता या प्रकरणात अत्यंत कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली.

या जनहिताच्या लढ्यात भक्कम साथ दिल्याबद्दल धनसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे, रायगड जिल्हा प्रभारी खा. सुरेश म्हात्रे (उर्फ बाळ्या मामा), रत्नागिरी जिल्हा निरीक्षक विजय देसाई आणि खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

सदर कारवाईच्या माध्यमातून धनसे यांनी एक जाहीर इशारा दिला आहे. "यापुढील काळात खाडीपट्ट्यामध्ये, विशेषतः सावित्री नदीच्या पात्रात चुकीच्या पद्धतीने आणि बेकायदेशीर काम करणाऱ्या कोणालाही आम्ही अजिबात सोडणार नाही.

जनतेच्या हिताशी खेळणाऱ्यांची गय केली जाणार नाही," असा सज्जड दम त्यांनी भरला आहे..

# निफाडच्या शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन निश्चित

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील निफाड तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन सुयोग्य व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी आयोजित करण्यात आलेली सहविचार सभा के. के. वाघ विद्याभवन, भाऊसाहेब नगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. तालुक्यातील क्रीडा शिक्षक, मुख्याध्यापक आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत स्पर्धांच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करून विविध जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य दिवाकर शेजवळ होते. यावेळी के. के. वाघ शिक्षण संस्थेचे जनसंपर्क प्रमुख व क्रीडाप्रेमी अजिंक्यदादा वाघ, नाशिक जिल्हा क्रीडा कार्यालयाचे पदाधिकारी भाऊसाहेब जाधव, शिवछत्रपती पुरस्कार विजेते अशोक दुधारे, निफाड तालुका क्रीडा अधिकारी शिवप्रसाद घोडके, माजी प्राचार्य यशवंत ढगे, मुख्याध्यापिका उज्वला तास्कर, प्राचार्य बाळासाहेब मोंढे, तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष विलास निरभवणे, सचिव माणिक गीते, रमेश मारवाडी, माजी क्रीडा केंद्रप्रमुख मधुकर देशमुख, तालुका क्रीडा केंद्रप्रमुख गोविंद कांदळकर, उपमुख्याध्यापिका सुनीता वडघुले तसेच पर्यवेक्षक डी. के. मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. संगीत विभाग प्रमुख अमोल मोरे यांनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



प्रमुख अतिथी अजिंक्यदादा वाघ यांनी तालुक्यातील क्रीडा शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करत, "खेळाडू घडविणारे खरे शिल्पकार म्हणजे क्रीडा शिक्षक," असे गौरवोद्गार काढले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा शिक्षकांचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

नाशिक जिल्हा क्रीडा कार्यालयाचे पदाधिकारी भाऊसाहेब जाधव यांनी के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या समृद्ध क्रीडा परंपरेचा गौरव करत आपल्या विद्यार्थी जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

तसेच नवनियुक्त तालुका क्रीडा केंद्रप्रमुख गोविंद कांदळकर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्याचा क्रीडा वारसा अधिक समृद्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तालुका क्रीडा अधिकारी शिवप्रसाद घोडके यांनी आगामी शालेय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबत आवश्यक सूचना देत सर्वांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे आवाहन केले.

शिवछत्रपती पुरस्कार विजेते अशोक दुधारे आणि माजी प्राचार्य यशवंत ढगे यांनीही क्रीडा स्पर्धांच्या गुणवत्तापूर्ण आयोजनासाठी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती अधिक बळकट करण्यावर भर दिला.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य दिवाकर शेजवळ यांनी तालुक्यातील सर्व क्रीडा शिक्षकांना आगामी स्पर्धांसाठी शुभेच्छा देत उत्कृष्ट नियोजन, समन्वय आणि शिस्तीच्या बळावर निफाड तालुक्याची क्रीडा परंपरा अधिक उंचावेल, असा विश्वास व्यक्त केला.

तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष विलास निरभवणे यांनी नवनियुक्त क्रीडा केंद्रप्रमुख गोविंद कांदळकर यांच्या गेल्या काही वर्षांतील उल्लेखनीय कार्याचा गौरव केला. खेळाडू व क्रीडा शिक्षकांच्या हितासाठी त्यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करत शासनाने नवोदित क्रीडा शिक्षकांची भरती करण्यासाठी सर्वांनी संघटित होण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोविंद कांदळकर यांनी केले. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांच्या आयोजन, स्पर्धास्थळे, वेळापत्रक, जबाबदाऱ्या आणि विविध तांत्रिक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्वांच्या सहभागातून खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धांचे नियोजन निश्चित करण्यात आले.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन दीपक कुंभार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एस. एन. धनगर, प्रकाश गोतरणे, क्रीडाशिक्षक समीर शेख, सागर डोखळे, दीपक गोपाळ तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी स्वप्नील जाधव, माधव गायकवाड, सुनील माळी, सोनाली गुरगुडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

निफाड तालुक्यातील आगामी शालेय क्रीडा स्पर्धांच्या दृष्टीने ही सहविचार सभा अत्यंत फलदायी ठरली असून, उत्कृष्ट नियोजनाच्या माध्यमातून यंदाच्या स्पर्धा अधिक दर्जेदार व यशस्वी होण्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# जय भवानी महाविद्यालयात "करिअर कट्टा" अंतर्गत, विद्यार्थी संसदेची स्थापना; विद्यार्थी संसद शपथ ग्रहण सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा शेख महेशर ताहेर, (प्रतिनिधी)** : पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहितीतंत्रज्ञान साह्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "करिअर कट्टा" ची स्थापना करून विद्यार्थी संसदेचा शपथ ग्रहण सोहळा उसाहात संपन्न झाला. या प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते. तर प्रमुख उद्घाटक म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी चे प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर हे होते . प्रारंभी करिअर कट्टा संसदेत नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांना गोपनियतेची व कर्तव्याची शपथ देण्यात आली. या वेळी आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा तसेच महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व करिअर विषयक उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प करण्यात आला. या प्रसंगी उद्घाटक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी सांगितले की विद्यार्थ्यामध्ये नेतृत्व गुण विकसीत होण्यासाठी व आपल्या जबाबदाऱ्या समजण्यासाठी व करिअर मध्ये विकास करण्यासाठी अत्यंत महत्वाचा उपक्रम आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन योग्य लाभ घ्यावा! असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी "करिअर कट्टा" या व्यासपीठाचा योग्य उपयोग करून आपल्या भविष्याची दिशा निश्चित करावी असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. या प्रसंगी करिअर कट्टा विभागाच्या समन्वयक तथा विद्यापीठ अधिसभेच्या सदस्या प्रा.डॉ.कल्पना घारगे, प्रा.डॉ.सुनिल जाधव, प्रा.सोमनाथ घाडगे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रा.विनोद किर्दक, नाटककार प्रा.बापू घोक्षे, क्रिडा विभागाचे प्रा.डॉ.प्रविण शिलेदार, प्रा.गोपाळ धांडे, प्रा.डॉ.बंडू लोखंडे,प्रा.डॉ.रामकृष्ण प्रधान, ग्रंथपाल प्रा.श्रीमती ज्योती रकटे आदि प्राध्यापक बांधव उपस्थित होते. या शपथ ग्रहण सोहळ्याचे दिमागदार संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले. व आभार प्रा. डॉ.शिवाजी काकडे यांनी मानले.या प्रसंगी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




**करिअर कट्टा उपक्रमाचा उद्देश...**

करिअर कट्टा हा महाराष्ट्र शासनाचा महत्वकांक्षी उपक्रम असुन. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यामध्ये नेतृत्व गुण, उद्योजकता, स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी, आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरणार आहे. पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयातील करिअर संसदेच्या स्थापनेमुळे ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना विविध उपक्रमाद्वारे स्वत:च्या कौशल्याचा विकास करण्याची एक नवी संधी निर्माण होणार आहे.

**विद्यार्थ्यामध्ये नेतृत्व गुण, करिअर नियोजन व सामाजिक जबाबदारीची जाणिव निर्माण करण्यावर भर...**

## श्रीवर्धनच्या विकासाला नवी गती; बहुउद्देशीय सभागृहासाठी ३ कोटींचा निधी मंजूर

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित** : श्रीवर्धन शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले असून, वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत श्रीवर्धन नगर परिषद हद्दीत बहुउद्देशीय सभागृहाच्या उभारणीसाठी तब्बल ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी खासदार श्री. सुनिलजी तटकरे, मंत्री तथा आमदार आदिती तटकरे आणि आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे उपलब्ध झाल्याचे सांगितले जात आहे.

प्रस्तावित बहुउद्देशीय सभागृहामुळे शहरात विविध शासकीय कार्यक्रम, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि क्रीडा उपक्रमांसाठी आधुनिक व सुसज्ज सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात गेल्या काही वर्षांत विकासकामांना मोठी चालना मिळाली आहे. पर्यटन विकास, मत्स्य व्यवसायासाठी विविध सुविधा, आरोग्य क्षेत्रातील पायाभूत कामे, रस्त्यांचे जाळे मजबूत करणे, तसेच इतर अनेक सार्वजनिक विकास प्रकल्पांमुळे तालुक्याच्या विकासाला वेग मिळत असल्याचे दिसून येत आहे.

बहुउद्देशीय सभागृहासाठी मंजूर झालेला हा ३ कोटी रुपयांचा निधी श्रीवर्धनच्या नागरी सुविधांमध्ये महत्त्वाची भर घालणारा ठरणार असून, शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विकासालाही नवी दिशा देईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# "इनरव्हील क्लब पनवेल"चा ४८ वा पदग्रहण सोहळा दिमाखात संपन्न

## करुनेश्वर वृद्धाश्रमाला धान्य व जीवनावश्यक साहित्य वाटप; नव्या कार्यकारिणीने समाजसेवेचा घेतला संकल्प

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, प्रतिनिधी** : इनरव्हील क्लब पनवेलचा ४८ वा पदग्रहण सोहळा शनिवारी पनवेल येथील तथास्तु हॉलमध्ये उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडला.




कार्यक्रमास इनरव्हील डिस्ट्रिक्ट ३१३च्या डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ. दीपशीखा पाठक तसेच आमदार प्रशांतदादा ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या वर्षासाठी डॉ. अमृता नाईक यांनी अध्यक्षपदाची धुरा स्वीकारली. सौ. निशिगंधा पाटील यांची सचिव, सौ. प्रिया ठाकूर यांची ISO, सौ. पूर्णिमा हळदीपुरकर यांची कोषाध्यक्ष (Treasurer), सौ. वर्षा ठाकूर यांची CC आणि सौ. शिल्पा चंदने यांची क्लब संपादिका म्हणून नियुक्ती करण्यात आली.



यावेळी नव्या कार्यकारिणीने आगामी वर्षात अधिक व्यापक स्वरूपात सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमादरम्यान इनरव्हील संस्थेच्या वतीने करुनेश्वर वृद्धाश्रमाला धान्य व जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच संस्थेतील डॉक्टर महिला सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. शोभना पालेकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

जगातील १०३ देशांमध्ये कार्यरत असलेली इनरव्हील संस्था महिला सक्षमीकरण, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक सेवेसाठी उल्लेखनीय कार्य करत आहे. पनवेल शाखेद्वारे गरजू महिला, गरीब विद्यार्थी, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, दिव्यांग मुली तसेच विविध सामाजिक घटकांसाठी सातत्याने उपक्रम राबविले जातात.

महिलांसाठी सर्व्हायकल कॅन्सर जनजागृती, मोफत तपासणी व लसीकरण, दिव्यांग मुलींना सॅनिटरी नॅपकिन्सचे वितरण, गुढीपाडवा व शिवजयंती मिरवणुकांमध्ये मोफत पिण्याच्या पाण्याचे वाटप, प्लास्टिकमुक्ती जनजागृती, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, मोडकळीस आलेल्या शाळांची दुरुस्ती, शाळांमध्ये स्वच्छतागृहे उभारणे, शैक्षणिक साहित्य वाटप, तसेच कारागृहातील कैद्यांसाठी समुपदेशन, रक्षाबंधनानिमित्त राखी बांधणे आणि प्रेरणादायी पुस्तके भेट देणे असे अनेक उपक्रम क्लब सातत्याने राबवत आहे.

कार्यक्रमास इनरव्हील क्लबच्या सदस्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> 'इनरव्हील क्लबने गेली अनेक वर्षे पनवेल आणि परिसरात सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपली आहे. यंदाची **'Glow and Flourish'** ही संकल्पना संस्थेच्या कार्याला अधिक व्यापक दिशा देईल. विकसित भारत २०४७चे स्वप्न साकार करण्यासाठी शासनासोबत सामाजिक संस्थांचाही सक्रिय सहभाग आवश्यक आहे आणि इनरव्हील ही भूमिका प्रभावीपणे पार पाडत आहे. नव्या अध्यक्षांसह संपूर्ण कार्यकारिणीला भावी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.'
>
> - आमदार प्रशांतदादा ठाकूर

> 'डॉ. अमृता नाईक यांची अध्यक्षपदी झालेली निवड अत्यंत योग्य आहे. नव्या कार्यकारिणीने संघभावनेने आणि समर्पित वृत्तीने काम केल्यास समाजसेवेचा विस्तार निश्चित होईल. इनरव्हीलची परंपरा अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक सदस्याने एकजुटीने कार्य करण्याची गरज आहे.'
>
> - डॉ. दीपशीखा पाठक (डिस्ट्रिक्ट चेअरमन)

> 'माझ्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी पूर्ण निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पार पाडण्याचा मी प्रयत्न करेन. यंदाच्या **'Glow and Flourish'** या थीमनुसार अधिकाधिक दर्जेदार आणि समाजोपयोगी उपक्रम राबविण्यावर भर असेल. माझ्या कुटुंबाने प्रत्येक टप्प्यावर दिलेल्या पाठिंब्यामुळेच मी आज या पदापर्यंत पोहोचले आहे. इनरव्हीलची सदस्य असल्याचा मला अभिमान असून, समाजसेवेचा हा प्रवास अधिक प्रभावी करण्यासाठी शंभर टक्के योगदान देईन.'
>
> - डॉ. अमृता नाईक (अध्यक्ष, इनरव्हील क्लब पनवेल)

# पंधरा वर्षीय मुलीसोबत अश्लील चाळे केल्याप्रकरणी गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पंधरा वर्षीय मुलीसोबत अश्लील चाळे केल्याप्रकरणी अंकुश बदाजी कातकरी (राहणार हाजी मलंग, मानपाडा, वावंजे) याच्याविरोधात 17 जुलै रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पंधरा वर्षीय मुलीच्या हाताला आणि कमरेला धरून तिच्यासोबत अश्लील चाळे केले. यावेळी तिने आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केला असता तिचे तोंड दाबले आणि कोणाला सांगितले तर मारण्याची धमकी दिली.

# अंगणवाडीच्या पोषण आहारात मृत पक्षी; चिमुकल्यांच्या जीवाशी खेळ कोणाचा?

**दैनिक युवक आधार**
**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी** : एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प निफाड-१ अंतर्गत देवगाव बिट क्रमांक २ मधील हनुमान मंदिराजवळील इंदिरानगर अंगणवाडी केंद्रातून वितरित करण्यात आलेल्या बंद पोषण आहाराच्या पाकिटात कुजलेल्या अवस्थेतील मृत पक्षी आढळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे लाभार्थी पालकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, लहान बालकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

देवगाव येथील प्रशांत कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुकदेव सदाशिव माळी यांची मुले आराध्या व आदित्य हे संबंधित अंगणवाडी केंद्राचे लाभार्थी आहेत. त्यांना देण्यात आलेले पोषण आहाराचे बंद पाकीट उघडताच त्यामध्ये कुजलेल्या अवस्थेतील मृत पक्षी आढळून आला. हा प्रकार पाहून कुटुंबीय हादरले. त्यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना माहिती दिली असून, या घटनेचे छायाचित्रही उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. अंगणवाडीतून वितरित होणारा पोषण आहार हा लहान बालके, गर्भवती व स्तनदा मातांच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र, अशा संवेदनशील योजनेतच दूषित पोषण आहार आढळल्याने अन्नसुरक्षा आणि गुणवत्ता नियंत्रणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या धक्कादायक प्रकाराची तातडीने सखोल चौकशी करून संबंधित पुरवठादार, उत्पादन संस्था आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच लाभार्थ्यांना वितरित करण्यात आलेल्या संपूर्ण पोषण आहाराच्या साठ्याची तपासणी करून दोषींना पाठीशी न घालता कडक शिक्षा द्यावी, अशी मागणी लाभार्थी पालकांकडून करण्यात आली आहे.

# मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत विशेष शिबिरास मतदारांचा उत्सुफर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण(SIR) – २०२६ कार्यक्रम सध्या 188 पनवेल विधानसभा मतदार केंद्रात सुरू आहे. या अतंर्गत मतदारांच्या सोयीसाठी 184 विधानसभा मतदान केंद्रावरती आज शनिवार दिनांक 18 जुलै व रविवार दिनांक 19 जुलै रोजी विशेष शिबिराचे आयोजन सकाळी 10.00 ते संध्याकाळी 4.00 वाजेपर्यंत करण्यात आले आहे. या अनुषंगाने आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी मंगेश चितळे तसेच मतदार नोंदणी अधिकारी पवन चांडक, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी नानासाहेब कामठे, संभाजी शेलार तसेच बाकी सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांनी विविध ठिकाणी भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी सर्व विशेष शिबिरास मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले.



या शिबिरांच्या ठिकाणी 574 बिएलओ ( बुथ लेव्हल ऑफीसर) तसेच 73 पर्यवेक्षक व 17 सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी विधानसभेच्या यादीभागानुसार मतदान केंद्रावर उपस्थित होते. या ठिकाणी गणना अर्जाचे (इन्युमरेशन फॉर्म) वाटप व संकलन करण्यात येत आहे. उद्या रविवार दिनांक 19 जुलै रोजी देखील हे शिबिर सुरू असणार आहे.पनवेल विधानसभा मतदार संघातील एकही पात्र मतदार मतदार यादीतून वगळला जाणार नाही याकरीता मतदारांनी या शिबिरास भेटी देऊन आपले गणना अर्ज भरावे असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने हे विशेष पुनरीक्षण अभियान राबविण्यात येत आहे. घरभेटी दरम्यान बीएलओंकडून आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी केली जात असून नागरिकांनी त्यांना योग्य माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सौदागर बाबा उर्सानिमित्त शायदा खान यांची दरगाहला भेट

## राज्यात शांतता व सौहार्दासाठी प्रार्थना

**दैनिक युवक आधार**
**कामठी वार्ताहर** : हजरत बाबा सय्यद सौदागर शाह (र.अ.) यांच्या वार्षिक उर्सानिमित्त लाला ओळी परिसरातील बाबा जॉन यांच्या दरगाहमध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अल्पसंख्याक विभागाच्या प्रदेश सचिव तसेच गरीब नवाज खिदमत कमिटीच्या मुख्य संयोजिका शायदा बेग अहमद खान चिश्ती यांनी उपस्थित राहून मजारवर चादर व पुष्प अर्पण केले. यावेळी त्यांनी राज्यात व देशात शांतता, सलोखा आणि बंधुभाव कायम राहावा, अशी प्रार्थना केली.



या प्रसंगी गरीब नवाज खिदमत कमिटीचे मुख्य संयोजक अहमद मोहम्मद बक्ष खान काश्मिरी, अध्यक्ष आहद खान कादरी, महासचिव शेख सकील, तसेच शेख अब्दुल असलम, साबिर शेख, जुबेर भाई, नईम बाबा, गुड्डू मस्तान, धीरजकुमार आकरे, सलीम खान, मुस्तुफा शेख, मौलाना नासिर, ममता कामडे, शेख रेहाना, शालिनी मेश्राम, रुबीना शेख यांच्यासह समितीचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.उर्सानिमित्त आयोजित कार्यक्रमात छोटू बाबा यांनी सर्व मान्यवरांचे दस्तारबंदी करून पारंपरिक पद्धतीने स्वागत व सत्कार केला.

धार्मिक श्रद्धा, सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे दर्शन घडविणाऱ्या या कार्यक्रमास भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

# पीडब्ल्यूडी खात झोपेत, नागरिकांच्या जीवाशी खेळ! चिडीपाडा येथे मोरी खचली; मृत्यू झाल्यावरच प्रशासन जागे होणार?

## खानाव उसर दुर्घटनेनंतरही धडा नाही; अलिबाग-रेवस मार्गावर आणखी एका जीवघेण्या अपघाताची भीती

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा:** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पी.डब्लू.डी) ढिसाळ कारभाराचा आणि निष्काळजीपणाचा आणखी एक नमुना अलिबाग-रेवस मार्गावरील चिडीपाडा येथे समोर आला आहे. येथील मोरीला मोठे भगदाड पडून रस्ता खचल्याने वाहनचालकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच खानाव उसर येथे अशाच प्रकारच्या भगदाडामुळे एका व्यक्तीचा बळी गेला होता. तरीही प्रशासनाने कोणताही धडा घेतला नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.चिडीपाडा येथील मोरी गेल्या अनेक महिन्यांपासून धोकादायक स्थितीत असल्याची माहिती स्थानिकांनी वारंवार संबंधित विभागाला दिली होती. रस्त्याला तडे जाणे, मोरीच्या बाजूने माती वाहून जाणे आणि संरचनेची कमकुवत अवस्था याबाबत अनेकदा तक्रारी करण्यात आल्या. मात्र अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. परिणामी अखेर मोरीचा मोठा भाग कोसळून रस्ता खचला आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेचा पर्दाफाश झाला.



अलिबाग-रेवस मार्ग हा रायगड जिल्ह्यातील अत्यंत वर्दळीचा आणि महत्त्वाचा मार्ग आहे. दररोज हजारो नागरिक, पर्यटक, शालेय वाहने आणि मालवाहतूक करणारी वाहने या मार्गाचा वापर करतात. अशा मार्गावरील धोकादायक मोरीकडे दुर्लक्ष करणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी थेट खेळ करण्यासारखे असल्याची तीव्र प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.खानाव उसर येथील दुर्घटनेत एका व्यक्तीचा जीव गेल्यानंतर प्रशासनाने सर्व धोकादायक ठिकाणांची पाहणी करून तातडीने उपाययोजना करणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात कोणतीही प्रभावी कारवाई झालेली दिसत नाही. त्यामुळे "एक जीव गेला तरी प्रशासनाला जाग आली नाही का?" असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

सध्या चिडीपाडा येथील भगदाड पावसामुळे अधिक धोकादायक बनले आहे. रात्रीच्या वेळी हे ठिकाण मृत्यूचा सापळा ठरू शकते. एखादे वाहन किंवा दुचाकी थेट खचलेल्या भागात गेल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. तरीही अद्याप कायमस्वरूपी दुरुस्ती किंवा मजबूत सुरक्षा उपाय दिसून येत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

स्थानिक नागरिकांनी या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. मोरीची अवस्था धोकादायक असताना संबंधित अभियंते आणि अधिकाऱ्यांनी वेळेत दखल का घेतली नाही? देखभाल आणि दुरुस्तीसाठी मंजूर झालेला निधी नेमका कुठे खर्च झाला? अशा प्रश्नांची उत्तरे आता जनतेला हवी आहेत.रायगड जिल्ह्यात रस्ते, पूल, मोऱ्या आणि सार्वजनिक बांधकामांची अवस्था दिवसेंदिवस चिंताजनक होत असताना केवळ अपघातानंतर पाहण्या आणि पंचनामे करून जबाबदारी झटकण्याची प्रशासनाची पद्धत नागरिकांच्या रोषाचे कारण ठरत आहे. चिडीपाडा येथील घटना ही केवळ मोरी खचण्याची नसून, सरकारी यंत्रणेच्या उदासीनतेची आणि निष्क्रियतेची गंभीर साक्ष असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.आता तरी शासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने कागदी घोडे नाचविण्यापेक्षा प्रत्यक्ष कामाला प्राधान्य देऊन तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा भविष्यात घडणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी संबंधित विभागावर राहील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# खाडपोली जिल्हा परिषद शाळेत ईपीआर फाऊंडेशन तर्फे खा–खेळा–वाचा' अभियानाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल :प्रतिनिधी** : भारताला एक निरोगी आणि आनंदी राष्ट्र बनवण्यासाठी आगामी पिढी सुदृढ असणे आवश्यक आहे. हाच धागा पकडून ईपीआर फाऊंडेशनच्या संस्थापिका अपर्णा शहा यांच्या संकल्पनेतून "खा-खेळा-वाचा" हे जनजागृती अभियान राबवले जात आहे. या अभियानांतर्गत नुकतीच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खाडपोली येथे सदिच्छा भेट आयोजित करण्यात आली होती.यावेळी विद्यार्थ्यांना "खा विचारपूर्वक, खेळा उत्साहपूर्वक आणि वाचा उत्स्फूर्तपणे" या संकल्पनेवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मुलांना केवळ व्याख्यान न देता, पीपीटी आणि विविध कलाकृतींच्या माध्यमातून विषयाची मांडणी केल्यामुळे ते अधिक प्रभावी ठरले. कार्यक्रमात योग्य आहाराचे महत्त्व, शारीरिक आरोग्यासाठी खेळांचे फायदे आणि मानसिक विकासासाठी वाचनाची गरज यावर भर देण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात हिरिरीने सहभाग घेतला आणि आनंद व्यक्त केला.




सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# नरसू पाटील सरांच्या नेतृत्वामुळे दिशा शिक्षण व विकास केंद्राला नवी ऊर्जा: प्राचार्य डॉ.जे.आर. फगरे

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : दूरदृष्टी, कार्यक्षमता आणि विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत दिशा शिक्षण व विकास केंद्र, गडहिंग्लजच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा नरसू पाटील सरांची सर्व सभासदांनी एकमताने बिनविरोध निवड केली. उच्च न्यायालय व धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे निरीक्षक श्री. सत्यनारायण शेनॉय यांच्या निरीक्षणाखाली दि. 17 जुलै 2026 रोजी संस्थेची त्रैवार्षिक निवडणूक मोठ्या उत्साहात व शांततापूर्ण वातावरणात पार पडली.

नरसू पाटील सरांनी ई. बी. गडकरी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या पुनरुज्जीवनासाठी केलेले प्रयत्न तसेच नरसू पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीची यशस्वी उभारणी यामुळे संस्थेने अल्पावधीतच वैद्यकीय शैक्षणिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. संस्थेच्या या प्रगतीमागील नेतृत्वाची दखल घेत सभासदांनी पुन्हा एकदा नरसू पाटीलसर यांच्यावर विश्वास दाखवित त्याची अध्यक्षपदी पुन्हा एकदा बिन विरोध निवड केली आहे.तर ब्रह्मानंद नरसू पाटील यांची सचिवपदी, संतू दत्तू पाटील यांची उपाध्यक्षपदी तर युवा नेतृत्व शुभम संतू पाटील यांची खजिनदारपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

त्यानंतर सभेत संस्थेचा जमाखर्च, आगामी अंदाजपत्रक तसेच हॉस्पिटल व महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांवर चर्चा करण्यात आली. सर्व ठराव सभासदांनी एकमताने मंजूर केले. यावेळी प्राचार्य डॉ. जे. आर. फगरे म्हणाले,की "नरसू पाटील यांच्या नेतृत्वामुळे



संस्थेला नवी ऊर्जा आणि नवी दिशा मिळाली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली असून भविष्यात महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्थांमध्ये दिशा शिक्षण व विकास केंद्राचे नाव निर्माण करण्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत."असे सांगून तेपुढे म्हणले नरसू पाटील यांच्या सक्षम नेतृत्वाखाली दिशा शिक्षण व विकास केंद्राच्या विकासाचा नवा अध्याय सुरू झाला असून नवी मुंबई सारख्या आपल्या कर्म भूमीतही त्यांनी आपल्या व्यवसाया बरोबर नगराज शेठ सीबीएस ईइंटरनॅशनल स्कूलसुरु केले आहे, शैक्षणिक संस्था, शिक्षण, संशोधन आणि सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात आणखी उंच भरारीघेत असतानाच त्याच्या शैक्षणिक कार्याचा आणि सामाजिकदृष्ट्या बांधिलकीचा विचार करता जागतिक कीर्तीच्या जेएनपीए बंदर प्रशासनाने सुद्धा त्याच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्तकरीत आपल्या मराठी मध्यम व इंग्रजी मध्यम जेएनपीए विद्यालयाची धुरा त्याच्या खांद्यावर सोपविली आहे;ही अत्यंतगौरवशाली बाब आहे; अशा खंबीर नेतृत्वावर आपण सर्वांनी विश्वास व्यक्त करून दिशा शिक्षण व विकास केंद्र, गडहिंग्लजच्या अध्यक्षपदी पुन्हाएकदा नरसू पाटील सरांची सर्व सभासदांनी एकमताने बिनविरोध निवड केली.आहे.त्यामुळे त्यांच्या कुशल नेतृत्वाचा दूरदृष्टी, कार्यक्षमतेचा फायदा संस्थेला नक्कीच होईल असे त्यांनी शेवटी सांगितले. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष नरसू पाटील यांनी संस्थेच्या भविष्यातील शैक्षणिक विस्ताराचा संकल्प व्यक्त करताना मरीन इंजिनिअरिंग कॉलेज, बीएचएमएस कॉलेजची 100 प्रवेश क्षमता वाढविणे तसेच पॅरामेडिकल शिक्षण क्षेत्रात नवीन संधी निर्माण करण्याचा मानस व्यक्त केला. "या परिसरातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी आणि या कॅम्पसचे नंदनवन करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न करू," असे त्यांनी सांगितले.

निवडीनंतर अध्यक्ष नरसू पाटील, सचिव ब्रह्मानंद पाटील व उपाध्यक्ष संतू दत्तू पाटील यांचा हायकोर्टचे प्रसिद्ध वकील प्रशांत भावके यांच्या हस्ते तर खजिनदार शुभम पाटील यांचा नारायण पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तसेच या प्रसंगी उपस्थित असणारे रायगड ठाणे येथील विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी आर.के.म्हात्रे सरांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचाली साठी त्यांना शुभेच्छा दिल्या,यावेळी संस्थेच्या प्रगतीत योगदान देणारे प्रशासकीय अधिकारी अप्पा शिवणे यांचाही विशेष गौरव करण्यात आला. त्याच बरोबर विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने प्राचार्य डॉ. जे. आर. फगरे यांच्या हस्ते नवनिर्वाचिसर्वत पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

## गळ्यातील चेन खेचून चोरटा पसार

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : 45 वर्षीय इसमाच्या गळ्यातील चेन खेचून चोरटा पसार झाला. या प्रकरणी 18 जुलै रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विश्वास निघोट हे खांदा कॉलनी सेक्टर 7 येथे राहत असून एका अनोळखी ईसमाने ते रस्त्याने एकटे चालत जात असताना तुम्ही मला धक्का का दिला असे बोलून त्यांची अडवणूक केली. यावेळी निघोट यांनी धक्का दिलेला नसतानाही अज्ञाताने त्यांच्यासोबत वाद घातला आणि दमदाटी केली आणि त्यांची मान पकडून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन जबरीने खेचून तो पळून गेला.

## जुगार प्रकरणी सहा जणांविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : तीन पत्ता जुगार खेळत असताना मिळून आल्या प्रकरणी अयुब इब्राहिम मदार, आहाद असलम पटेल, जाहीर अतीक मुल्ला, मोबीन इस्माईल खामकर, सलीम गुलजार पटेल, सलमान इकबाल पटेल यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 17 जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मन्नत कॉलनी येथील एका रूमच्या भिंतीच्या आडोशाला तळोजा गाव या ठिकाणी तीन पत्ती जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकला. यावेळी आरोपींकडून 57 हजार रुपये हस्तगत करण्यात आले. या प्रकरणी तळोजा पोलीस अधिक तपास करत आहेत.

# लोकनेते आदरणीय स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आढावा बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : न.मा.द. महाविद्यालय, गोंदिया येथील सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गोंदिया जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक राज्यसभा खासदार श्री राजेंद्र जैन यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आमदार श्री राजकुमार बडोले यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न झाली.




राज्याचे लोकनेते आदरणीय स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यासाठी २२ ते २८ जुलै या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात ""जनसेवा सप्ताह"" साजरा करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या सप्ताहादरम्यान खासदार श्री प्रफुल पटेलजी यांच्या मार्गदर्शनात लोकोपयोगी, समाजहिताचे व जनकल्याणकारी विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने गोंदिया जिल्ह्यात रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिर, सार्वजनिक स्थळे व स्मारके स्वच्छता अभियान, शेतकरी सन्मान, युवा संवाद व संकल्प, विद्यार्थी व महिला सक्षमीकरणाचे उपक्रम तसेच विविध सामाजिक कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात आले.

बैठकीत मार्गदर्शन करताना खासदार श्री राजेंद्र जैन यांनी सांगितले की, लोकनेते आदरणीय स्व.अजितदादा पवार यांनी आयुष्यभर जनसेवेला सर्वोच्च प्राधान्य दिले. आदरणीय दादांच्या जनसेवेचा वसा पुढे नेत समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शासनाच्या योजना व सेवा पोहोचविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यामुळे जनसेवा सप्ताहातील सर्व उपक्रम लोकसहभागातून यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आमदार श्री राजकुमार बडोले यांनीही जनसेवा सप्ताहातील सर्व कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. बैठकीस सर्वश्री खासदार राजेन्द्र जैन, आमदार राजकुमार बड़ोले, नरेश माहेश्वरी, जिल्हाध्यक्ष प्रेमकुमार राहंगडाले, राजलक्ष्मी तुरकर, देवेन्द्रनाथ चौबे, विनोद हरिनखेड़े, प्रभाकर दोनोडे, सुरेश हर्षे, केतन तुरकर, नानू मुदलियार, माधुरी नासरे, कुंदन कटारे, अविनाश काशिवार, अजय गौर, केवल बघेले, जगदीश बावनथड़े, योगेंद्र भगत, टी एम पटले, अजय उमाटे, विशाल शेंडे, डी यू राहंगडाले, लोकपाल गहाने, रमेश ताराम, सी के बिसेन, यशवंत गणवीर, जियालाल पंधरे, अशोक शहारे, मनोज डोंगरे, किरण पारधी, सतीश देशमुख, टीकाराम मेंढे, सलीम जवेरी, सोमेश रहांगडाले, सुरेंद्र रहांगडाले, शिव शर्मा, दिनेश अग्रवाल, कल्लू यादव, राज शुक्ला, बंटी पटले, पूजा सेठ, कीर्ति पटले, बिरजुला भेलावे, ममता बैस सहित जिल्ह्यातील पक्षाचे पदाधिकारी, आघाडी-सेलचे प्रमुख, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होत

# विठ्ठल नामाची शाळा भरली'; प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा नयनरम्य रिंगण सोहळा

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : आषाढी एकादशीचे औचित्य साधत प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, इंदापूर येथे विद्यार्थ्यांचा पारंपरिक दिंडी व रिंगण सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात पार पडला. वारकरी संप्रदायाची परंपरा, संतांचा वारसा आणि विठ्ठलभक्तीची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाने संपूर्ण शाळा परिसर विठ्ठलमय झाला.'विठ्ठल नामाची शाळा भरली' या अभंगाचा प्रत्यय देणारे वातावरण निर्माण झाले होते. वारकऱ्यांच्या वेशभूषेतील चिमुकले, पालखी मिरवणूक, टाळ-मृदुंगाचा गजर आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला. विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत नामदेव, मुक्ताबाई यांच्यासह विविध संतांच्या वेशभूषेत साकारलेल्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही प्राचार्य एस.एम.भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.शाळेच्या मैदानावर पालखी सोहळ्यानंतर पंढरपूरच्या वारीप्रमाणे रिंगण सोहळा रंगला. विद्यार्थ्यांच्या हातातील भगवे ध्वज,मुलींच्या डोक्यावर तुळशी वृंदावन, कलश, ग्रंथ आणि वृक्ष पाहून जणू पंढरपूरची वारीच इंदापूरात अवतरल्याचा भास होत होता.एरवी गणवेशात दिसणारे विद्यार्थी या दिवशी पांढरा झब्बा, गांधी टोपी, गळ्यात टाळ, कपाळी बुक्का अशा वारकरी वेशात सहभागी झाले होते. तर मुलींनी नऊवारी साडी,केसात गजरा आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन पारंपरिक वेशभूषेत सहभाग नोंदविला."विठ्ठल नामाची



शाळा भरली, शाळा शिकताना तहान-भूक हरली" या अभंगाप्रमाणे बालवारकरी विठ्ठलभक्तीत तल्लीन झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

यावेळी लेझीम दिंडी,टाळ दिंडी,वृक्षदिंडी, हेल्थ दिंडी, पताका दिंडी,तुळशी वृंदावन दिंडी,ग्रंथ दिंडी आणि कलश दिंडी अशा विविध आकर्षक दिंड्यांनी रिंगण सोहळ्याची शोभा वाढवली. अभंगांच्या ठेक्यावर विद्यार्थी व शिक्षकांनी फुगडी खेळत श्रीक्षेत्र पंढरपूरातील भक्तिमय वातावरणाची अनुभूती शाळेच्या क्रीडांगणावर निर्माण केली.

सोहळ्यानिमित्त पालखीची आरती प्रमुख पाहुणे आणि पालकांच्या हस्ते करण्यात आली. कार्यक्रमासाठी संतोष परदेशी(डिस्ट्रिक्ट डायरेक्टर, युथ –रोटरी क्लब),रविशंकर खारमोडे, श्रीकांत मडगे,डॉ.संतोष मोरे, रोटरी क्लब इंदापूर सेंट्रलच्या अध्यक्षा मंदाकिनी डोंबाळे, ज्ञानदेव डोंबाळे, संस्थेचे व्हाइस चेअरमन इम्रान शेख,प्राचार्य एस.एम.भिसे तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व दिंडी प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन काळे मॅडम आणि बनसोडे मॅडम यांनी केले.संपूर्ण सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, संत संस्कृती आणि भक्तीमय संस्कारांचा अनोखा अनुभव मिळाला.

# प्रकाश भाऊ उमाटे आयटीआयमध्ये निरोप समारंभ व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले**

**भंडारा** : भंडारा, दि.१७ जुलै २०२६ रोज शुक्रवार ला स्थानिक प्रकाश भाऊ उमाटे औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), भंडारा येथे शैक्षणिक वर्ष पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ तसेच वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य वसीम शेख होते. प्रमुख अतिथी म्हणून देवीदासजी डोंगरे व कमलेशजी डोंगरे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या




हस्ते दीपप्रज्वलन करून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यावेळी विविध ट्रेडमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. इलेक्ट्रिशियन ट्रेडमध्ये मनीष वैद्य यांनी प्रथम क्रमांक मिळवला, तर फिटर ट्रेडमध्ये जितेंद्र राजेश बन्सोड यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तसेच शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

निरोप समारंभात विद्यार्थ्यांनी संस्थेतील शिक्षणाचा प्रवास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्मरणीय अनुभव याविषयी मनोगत व्यक्त करत कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या भावना व्यक्त होत असताना सभागृहातील वातावरण भावूक झाले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व पटवून देत प्रामाणिकपणा, शिस्त आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर उद्योग क्षेत्रात यश मिळवण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य वसीम शेख यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत संस्थेचे नाव देशभरात उज्ज्वल करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उन्नती सावरबांधे यांनी केले, तर आभार प्रदर्शन हिमांशु वंजारी यांनी केले. या प्रसंगी संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# दर्यापूर–अकोला रोडवरील भीषण दुचाकी अपघात; शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांनी दाखवली माणुसकी

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : दर्यापूर-अकोला रोडवरील गोळेगाव फाटा येथे शनिवारी रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास दोन दुचाकींचा भीषण अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांनी अवघ्या पाच मिनिटांत घटनास्थळी धाव घेत जखमींना मदतीचा हात देत मानवतेचे दर्शन घडविले.

अपघातात अनेक जण गंभीर जखमी झाले होते. गोपाल पाटील अरबट यांनी आपल्या सहकाऱ्यांसह तातडीने बचावकार्य सुरू करून जखमींना त्वरित रुग्णालयात



दाखल केले. वेळेवर उपचार मिळाल्याने जखमींचे प्राण वाचविण्यास मोठी मदत झाली.

या अपघातातील सर्वात हृदयस्पर्शी घटना म्हणजे, अपघाताच्या धडकेत दीड महिन्याचे चिमुकले बाळ हवेत फेकले गेले,

**दीड महिन्याच्या चिमुकल्याला देवाने दिले जीवदान**

**अपघातात दीड महिन्याचे चिमुकले बाळ हवेत फेकले गेले. मात्र, सुदैवाने त्या बाळाला कोणतीही इजा झाली नाही. शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट व त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात दाखल करून वेळेवर मदत केली. त्यांच्या या तत्पर व मानवतावादी कार्याचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.**

मात्र सुदैवाने त्या बाळाला कोणतीही इजा झाली नाही. उपस्थित नागरिकांनी ही घटना देवाची कृपा असल्याची भावना व्यक्त करत सुटकेचा निश्वास सोडला.

बचावकार्यात राहुल भुवर, नगरसेवक वसीम भाई, हेमंत उमाळे, अतुल सगाणे, सागर गोठे, विनय गावंडे, रोहित खंडारे, तुषार चौधरी आणि शिवा उंबरकर यांनीही मोलाचे सहकार्य केले. सर्वांनी जखमींना तातडीने रुग्णालयात हलवून मानवतेचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले.

अपघातानंतर काही काळ दर्यापूर-अकोला रोडवरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला असून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

# निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे तहसीलदार दिपक पुंडे यांना निवेदन;मालेगाव–आमखेडा रस्त्याला अखेर न्याय मिळणार का?

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव–कोल्ही–बोरगाव–पिंपळा–आमखेडा हा भागातील अत्यंत महत्त्वाचा संपर्क रस्ता आज अक्षरशः मृतावस्थेत पोहोचला आहे. या रस्त्यावरून चारचाकी व दुचाकी वाहने तर सोडाच, साध्या पायी चालणाऱ्या नागरिकांनाही जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत सातत्याने बातम्या प्रसिद्ध होत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग, आमदार, खासदार, वरिष्ठ अधिकारी व संबंधित यंत्रणांचे वारंवार लक्ष वेधण्यात आले. मात्र आजपर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही.



याच पार्श्वभूमीवर निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने मालेगावचे कर्तव्यदक्ष तहसीलदार दिपक पुंडे यांना मालेगाव–कोल्ही–बोरगाव–पिंपळा–आमखेडा रस्त्याची तात्काळ दुरुस्ती, डांबरीकरण व रुंदीकरण करण्याची मागणी करणारे निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय गणेशजी कचकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांच्या नेतृत्वात सादर करण्यात आले.

गेल्या अनेक दिवसांपासून दैनिक युवक आधारच्या माध्यमातून या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत सातत्याने बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या. सार्वजनिक बांधकाम विभाग, आमदार, खासदार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत हा प्रश्न वारंवार पोहोचविण्यात आला. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात पाठपुरावा करूनही अद्याप कोणत्याही सक्षम यंत्रणेने प्रत्यक्ष दखल घेतलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

"आम्ही भारत देशातील महाराष्ट्राचे नागरिक नाही का? आम्ही आमच्या हक्काचा रस्ता मागत आहोत, भिक नाही." असा संतप्त सवाल आता लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येकाच्या तोंडी ऐकायला मिळत आहे. रस्ता नसल्यामुळे रुग्ण, विद्यार्थी, शेतकरी, महिला व सर्वसामान्य नागरिकांना रोजच प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. एवढ्या बातम्या, निवेदने आणि मागण्या करूनही संबंधित यंत्रणा शांत का आहे, हा प्रश्न प्रत्येक नागरिकाला अस्वस्थ करत आहे.

ग्रामस्थांनी एक भावनिक मागणीही केली आहे. "आदरणीय तहसीलदार दिपक पुंडे साहेबांनी स्वतः सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालेगाव येथील अधिकाऱ्यांना सोबत घेऊन मालेगाव ते आमखेडा या संपूर्ण रस्त्यावरून एकदा प्रत्यक्ष प्रवास करावा. त्यानंतरच हा खरोखर रस्ता आहे की खड्ड्यांचे साम्राज्य, याचा निर्णय घ्यावा. देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक दशके झाली, तरी आजही जर ग्रामीण भागातील नागरिकांना अशा रस्त्यावरून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असेल, तर ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

आपण नेमके कोणत्या विकासाच्या काळात जगत आहोत?" असा उद्विग्न प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

नागरिकांचे म्हणणे आहे की, आता येथील जनतेचा विश्वास राजकीय पुढाऱ्यांवर उरलेला नाही. मात्र कर्तव्यदक्ष तहसीलदार दिपक पुंडे यांच्यावर पूर्ण विश्वास असून, तेच या प्रश्नाला न्याय देतील आणि संबंधित विभागाकडून योग्य ती कार्यवाही करून घेतील, अशी शंभर टक्के खात्री आम्हाला आहे, अशा भावना अनेक ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

> 'साहेब, मालेगाव–कोल्ही–बोरगाव–पिंपळा–आमखेडा हा रस्ता हजारो नागरिकांच्या जीवनाशी निगडित आहे. आपण स्वतः या रस्त्याची पाहणी करून संबंधित विभागाकडून हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा. या भागातील जनतेचा आपल्या प्रशासनावर पूर्ण विश्वास आहे.'
> — करण धोंगडे, जिल्हाध्यक्ष, निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ

> 'निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाने दिलेले निवेदन स्वीकारण्यात आले असून ते तात्काळ सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालेगाव यांच्याकडे पाठविण्यात येईल. संबंधित विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी, याबाबत सूचना करण्यात येतील.'
> — दिपक पुंडे, तहसीलदार, मालेगाव

दैनिक युवक आधारने या रस्त्याचा प्रश्न सातत्याने लावून धरला असून, सार्वजनिक बांधकाम विभागापासून ते लोकप्रतिनिधींपर्यंत प्रत्येक स्तरावर हा विषय पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. आता या निवेदनानंतर प्रशासनाकडून प्रत्यक्ष कार्यवाही होऊन मालेगाव–कोल्ही–बोरगाव–पिंपळा–आमखेडा मार्गावरील नागरिकांना दिलासा मिळतो का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

यावेळी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष करण धोंगडे, तालुका अध्यक्ष प्रकाश भुरे तसेच रिसोड तालुका अध्यक्ष गोपाल बोरकर पाटील उपस्थित होते.

# अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सर्वपक्षीय समितीतर्फे अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे :** लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सर्वपक्षीय जयंती उत्सव समिती, जालना यांच्या वतीने त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक व परिवर्तनवादी कार्याचा गौरव करण्यात आला.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना विधानसभा मतदारसंघाचे लाडके आमदार श्री. अर्जुनभाऊ खोतकर हे होते. समितीचे अध्यक्ष किरण सिरसाठ यांनी प्रास्ताविक केले, तर कार्याध्यक्ष ज्ञानदेव नागरे यांनी आपल्या मनोगतात अण्णाभाऊ साठे यांच्या समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाच्या विचारांचा समाजाने अंगीकार करून ते पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

यानंतर उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. उपस्थितांनी त्यांच्या कार्याला अभिवादन करत समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि मानवतेच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.यावेळी समितीचे अध्यक्ष किरण सिरसाठ, उपाध्यक्ष इब्राहिम शेख, कार्याध्यक्ष ज्ञानदेव नागरे, सचिव संतोष मच्छिंद्र रासवे, संजू गायकवाड, शिवसेना संपर्क प्रमुख पंडितदादा भुतेकर, संतोष निकाळजे, किशोर कांबळे, संतोष तुपसुंदर, डी. ई. नामवड, संतोष कांबळे, रवी शोरात, ओंकार घोडे, मयूर गोफणे, राम सुतार, गणेश चौधरी, अशोक तांवे, राहुल जाधव, राजेश सगट, आकाश दळीजे, जय आठवले, दिपक आमीलढंगे आणि अंकुश यंगड यांच्यासह समितीचे पदाधिकारी, विविध पक्षांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार सचिव संतोष मच्छिंद्र रासवे यांनी मानले.

# पद्मश्री मिलिंद कांबळेंची स्वच्छता दूत फाउंडेशन प्रशिक्षण केंद्राला भेट

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी स्वच्छता दूत फाउंडेशनच्या स्वच्छता कामगार प्रशिक्षण केंद्राला सदिच्छा भेट देऊन संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी फाउंडेशनच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. उपस्थित स्वच्छता कामगारांशी संवाद साधताना पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी शिक्षण, कौशल्यविकास, आर्थिक स्वावलंबन आणि उद्योजकता यावर भर देत स्वच्छता कामगारांनी बदलत्या काळानुसार स्वतःला सक्षम करण्याचे आवाहन केले.

यावेळी स्वच्छता दूत फाउंडेशनच्या वतीने संस्थेच्या गेल्या २० वर्षांच्या कार्याचा आढावा सादर करण्यात आला.




स्वच्छता कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम, यशोगाथा, सामाजिक परिवर्तनाचे प्रयत्न तसेच भविष्यातील विकास आराखडा पद्मश्री कांबळे आणि उपस्थितांसमोर मांडण्यात आला.

सफाई कामगारांच्या सक्सेस यावेळी स्टोरी मांडण्यात आल्या व प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र देण्यात आले. मैथिली मिलिंद कांबळे, माया साबळे, रिबेका पाखरे, समाधान घुले, रत्नमाला राजगिरे, मंदाबाई आठवले, दिगंबर तुपे, प्रेम पाटोळे, हबीब खान उपस्थित होते.

# भिवापूर तालुक्यातील पुल्लर येथे प्रवासी निवाऱ्याची मागणी



**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे नागपुर -** पासून 75 Km अंतरावर भिवापुर तालुका आहे. आणि भिवापुर पासुन उत्तर दिशेला 12 Km अंतरावर पुल्लर हे 1500 लोकसंख्या असणारं भरगच्च वसतीचं गाव आहे . पुल्लर पासून भिवापुर ला रोज ग्रामस्थ + शाळकरी मुले + वृद्ध अनेक लोक सरकारी वाहणाने [ st ] प्रवास करतात . येणा जाणा करतात . परंतु दुःख व चिंतेची भयावह बाब म्हणचे पुल्लर बायपास येथे प्रवासी थांबा बसस्टॉप नाही . उन, वारा, पाऊस, तसेच विजांचा गडगडाट, प्रचंड वादळ वारा, अशात थांबावं कुटं हा महाभयंकर प्रश्न ग्रामस्थांना, शाळकरी मुलांना पडतोयं, अशातं महत्वाचां म्हणजे स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधी यांनी कसुन नेतृत्व घेऊन पुल्लर बायपास येथे प्रवासी थांबा म्हणजेच बसस्टॉपचे नियोजन करने आज अत्यंत काळाची गरज आहे . या ,संदर्भात शासनाने लक्ष देऊन पुल्लर बायपास येथे बसस्टॉप उभारण्यात यावे अशी मागणी ओबीसी सेवा संघाचे नागपूर जिल्हा अध्यक्ष नारायण उदापूरे यांनी एका पत्रकाद्वारे केलेली आहे.

# सहयोग बँक व उडान फाउंडेशनतर्फे कोपरा येथे शालेय बॅग वाटप विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत सामाजिक बांधिलकीचा संदेश

**दैनिक युवक आधार**

**आर्णी प्रतिनिधी :** सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी तथा उडान फाउंडेशन, आर्णी शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ जुलै रोजी जिल्हा परिषद शाळा, कोपरा (ता. आर्णी, जि. यवतमाळ) येथे विद्यार्थ्यांसाठी शालेय बॅग वाटप कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात शब्दसुमनाने व भारतीय संविधानाच्या सामूहिक वाचनाने करण्यात आली. तर कार्यक्रमाची सांगता वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत करण्यात आली.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोग बँकेचे जिल्हा प्रमुख गौरव वाकोडीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे जिल्हा सेवाधिकारी तथा हरिभक्त परायण ग्रामगीताचार्य दत्ताभाऊ मार्कंड, यवतमाळ जिल्हा भजन प्रमुख यादवराव पिंगळे पाटील, आर्णी तालुका सेवाधिकारी मारुती पिलावन पाटील, बाबूलालभाऊ राठोड, तुळशीरामजी भायमारे यांची उपस्थिती लाभली. तसेच सहयोग आर्णी शाखेचे व्यवस्थापक जयदीप राठोड यांच्यासह युवराज सरोदे, योगेश राठोड, अनुप राजूरकर, पूजा मॅडम, आरती मॅडम, कीर्ती मॅडम, अलका मॅडम, दुर्गेश सर, सचिन सर व विकेश सर उपस्थित होते.

यावेळी शाखा व्यवस्थापक जयदीप राठोड यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगताना "शिक्षण हीच खरी संपत्ती असून शिक्षणाच्या बळावरच जीवनात मोठे यश संपादन करता येते," असे प्रतिपादन केले.

दत्ताभाऊ मार्कंड यांनी विद्यार्थ्यांना चांगले संस्कार, शिस्त, प्रामाणिकपणा व नियमित अभ्यासाचे महत्त्व पटवून देत उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा दिली. अध्यक्षीय समारोपात गौरव वाकोडीकर यांनी सहयोग बँकेच्या विविध बचत योजना, ठेवी, कर्ज सुविधा व समाजाभिमुख उपक्रमांची माहिती देत शिक्षणाबरोबरच बचतीचे महत्त्वही विद्यार्थी व पालकांना विशद केले.

कार्यक्रमास जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक निलेश बनसोडे, रोशनी बनसोडे, गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी, शिक्षकवृंद, गावातील ज्येष्ठ नागरिक, पालक, सहयोग बँकेचे कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप करण्यात आले. नवीन शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, सामाजिक उत्तरदायित्व जपणे आणि उज्ज्वल भविष्य घडविणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले

# अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेची दर्यापूर तालुका कार्यकारिणी जाहीर

## गौरव टोळे यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्ष शीलवंत रायबोले सोमेश रहाटे व रामसिंग रघुवंशी यांची सचिवपदी बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे | तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : दि.१५ अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेच्या दर्यापूर तालुका कार्यकारिणीची घोषणा नुकतीच अमरावती येथे झालेल्या संघटनेच्या बैठकीत करण्यात आली. संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष मनोहरराव सुने यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत दर्यापूर तालुक्याची नवीन कार्यकारिणी एकमताने जाहीर करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीत गौरव टोळे यांची तालुकाध्यक्षपदी, सोमेश रहाटे व शीलवंत रायबोले यांची उपाध्यक्षपदी, रामसिंग रघुवंशी यांची सचिवपदी, सचिन मानकर यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच विकास महाजन, सचिन बोबडे, युवराज डोंगरे, शुभम घाटे, बाळासाहेब सोनाळकर, सोपान गोंडचोर, अजय वर आणि डॉ. प्रकाश चिंचोळकर यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

यावेळी केंद्रीय सरचिटणीस अशोक पवार, प्रदेश सरचिटणीस राजेंद्र ठाकरे, जिल्हाध्यक्ष सुधाकर टिपरे, विदर्भ पश्चिम सरचिटणीस सुरेशसिंग मोरे, संघटक अनंतराव बोबडे, जिल्हा सचिव मनोज मेळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व ग्रामीण पत्रकार उपस्थित होते.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण, संघटनात्मक बळकटी, पत्रकार कल्याण आणि ग्रामीण भागातील पत्रकारितेला अधिक सक्षम करण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.



नवनियुक्त अध्यक्ष गौरव टोळे यांनी संघटनेने सोपविलेल्या जबाबदारीबद्दल वरिष्ठांचे आभार मानत, दर्यापूर तालुक्यातील सर्व ग्रामीण पत्रकारांना एकत्र घेऊन संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याचा विश्वास व्यक्त केला.

**दर्यापूर तालुका कार्यकारिणी**

अध्यक्ष : गौरव टोळे

उपाध्यक्ष : सोमेश रहाटे, शीलवंत रायबोले

सचिव : रामसिंग रघुवंशी

कोषाध्यक्ष : सचिन मानकर

सदस्य : विकास महाजन, सचिन बोबडे, युवराज डोंगरे, शुभम घाटे, बाळासाहेब सोनाळकर, सोपान गोंडचोर, अजय वर, डॉ. प्रकाश चिंचोळकर

# हिंगोलीत युवक काँग्रेसची मासिक आढावा बैठक उत्साहात; नव्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत व संघटन बळकटीकरणावर भर



**दैनिक युवक आधार**

**हिंगोली जिल्हा प्रतिनिधी प्रशांत टाकसाळ** : युवक काँग्रेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेली मासिक आढावा बैठक तसेच नव्याने नियुक्त पदाधिकाऱ्यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या बैठकीचे आयोजन युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सायनाथ पाटील जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.या कार्यक्रमास विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान संघटनेच्या सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच आगामी उपक्रमांची आखणी, संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि युवकांना मोठ्या प्रमाणात संघटनेशी जोडण्याबाबत चर्चा करण्यात आली.

या प्रसंगी नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी युवक काँग्रेसची भूमिका, संघटनेची वाढ आणि सामाजिक कार्यातील सहभाग याबाबत मार्गदर्शन केले. बैठकीत पुढील काळात गावपातळीवर संघटन विस्तार करण्याचा, युवकांच्या समस्या सोडविण्यासाठी विशेष मोहिमा राबविण्याचा तसेच विविध सामाजिक उपक्रम हाती घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रिय सहकार्य केले.

# माजी कबड्डी पटूंचा पुंडा येथे गेट-टुगेदर, "मातीचा खेळ" लोप पावल्याची खंत !!

## जागतिक कबड्डी दिनानिमित्त माजी खेळाडू एकत्र !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी** : आकोट तालुक्यातील पुंडा येथे जागतिक कबड्डी दिनानिमित्त नंदिकेश्वर मंडळ पुंडा यांच्या वतीने १९८० पासून खेड्यापाड्यात कबड्डी खेळणाऱ्या माजी पटूंचा खास गेट-टुगेदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष अकोला जिल्हा भाजपा संतोष शिवरकर तसेच प्रमुख पाहुणे माजी सचिव हौशी कबड्डी असोसिएशनचे वासुदेवराव नेरकर होते.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती डॉ सुरेश आढाऊ, उद्धव महाराज कुलट, गजानन पाटील पुंडकर, नाना पाटील गावंडे,राजू राऊत,बंडू खुमकर,सुभाष चव्हाण,श्रीधर तिवाने,बंडू पुंडकर तसेच पुंडा येथील नॅशनल ला खेळणारे कबड्डीपटू ज्ञानेश्वर पाटील कुलट यांची प्रमुख उपस्थिती लाभली. एकेकाळी अकोट तालुक्यातील गावोगावी कबड्डीच्या स्पर्धा गाजत होत्या. त्या काळातील अनेक तरुण खेळाडू आज २०२६ मध्ये ५० वर्ष वयाचे



झाले आहेत.अनेक वर्षांनंतर हे सर्व जुने सहकारी पुंडा येथे एकत्र आले आणि एकमेकांना भेटून गहिवरून आले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व माजी पटूंचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर मातीवरील कबड्डीच्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. गावातील मैदान, रात्रीचे सामने आणि मातीत खेळण्याची मजा यावर सर्वांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या.मॅटवरील प्रो कबड्डीला लोकप्रियता मिळत असताना ग्रामीण भागातील पारंपरिक मातीची कबड्डी मात्र हळूहळू कमी होत चालली आहे,यावर सर्व खेळाडूंनी खंत व्यक्त केली. खेळाचे स्वरूप बदलले तरी मातीतील कबड्डीची संस्कृती जपणे गरजेचे आहे, असे मत यावेळी व्यक्त झाले.

हा मेळावा केवळ भेटीगाठीसाठी नसून कबड्डीच्या मुळाशी असलेल्या परंपरेची जपणूक व्हावी या उद्देशाने नंदिकेश्वर मंडळ पुंडा यांनी आयोजित केला होता या कार्यक्रमांमध्येच राजेंद्र पुंडकर व एकनाथ अंबुसकर यांचा वाढदिवस सुद्धा साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला अकोली जहागीर,सातेगाव,लाखपुरी केळीवेळी,पिंपरी, जस्तगाव बेलखेड,रोहना, धुडकी,वरूर जऊळका,उमरी (अकोला) जैनपुर,पिंपळोद, वनीवरुळा, हातरून,मोरझाडी हिंगणी गोर्धा,माऊली धांडे,पणज, वडद,अकोला, अमरावती,येथील माजी खेळाडूंनी भाग घेतला होता सर्व खेळाडूंना जेवणाची व्यवस्था केली होती.या कार्यक्रमाचे प्रसिद्धीसाठी चित्रीकरण करण्याचे काम गन्ना का फन्ना या चैनल चे संपादक व माजी खेळाडू गणेश साखरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी,भास्कर पुंडकर,उमेश लांडे राजेंद्र पुंडकर,अनिल पाटील कुलट प्रमोद पुंडकर (गुरुजी) मदन भरणे,प्रदीप काकड, डॉ नंदकिशोर कुलट,विठ्ठल साबळे,नंदू प.कुलट,गोपाल झामरे, ज्ञानेश्वर आढे,संदीप कुलट,सुभाष काकड, पिंटू भास्करराव कुलट दुर्योधन वानखडे,पांडुरंग कांदे, गोपाल पुंडकर,रावसाहेब कुलट,भुजिंग शेळके,विजय खंडारे,निळू लांडे यांनी कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडला,कार्यक्रमाचे संचालन नरेंद्र खुमकर यांनी केले.तर आभार प्रदर्शन अध्ययन समाचार तालुका प्रतिनिधी अरुण काकड यांनी केले.

# श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे मुख्याध्यापक पदी शांतीकुमार सावरकर यांची नियुक्ती !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी:** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारे संचालित स्थानिक 'श्री शिवाजी हायस्कूल, तेल्हारा' येथील मुख्याध्यापक पदावर शांतीकुमार प्रभाकरराव सावरकर यांची सेवाज्येष्ठतेनुसार नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्यासह सर्व कार्यकारिणी सदस्य व आजीवन सदस्यांनी त्यांची नियुक्ती केली आहे.

**शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातील योगदानाची दखल :**

शांतीकुमार सावरकर यांचा शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी सतत मदत करण्याची त्यांची वृत्ती सर्वपरिचित आहे. यासोबतच, तालुका पातळीवर विविध क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करून राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवण्यात त्यांनी मोलाचे योगदान



दिले आहे. त्यांच्या याच उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन संस्थेने त्यांच्याकडे मुख्याध्यापक पदाची धुरा सोपवली आहे.

**अमरावती आणि तेल्हारा येथे सत्कार व शुभेच्छांचा वर्षाव :**

या नियुक्तीनंतर अमरावती येथे संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, भैय्या साहेब पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, सदस्य हेमंत काळमेघ, प्रा. केशवराव गावंडे, सुरेशदादा खोटरे, प्रा. सुभाष बनसोड, सचिव डॉ. वि. गो. ठाकरे, प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, विजय ठोकळ, तसेच सरव्यवस्थापक पंडित पंडागळे यांनी सावरकर यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तेल्हारा येथे आगमन होताच संस्थेचे आजीवन सदस्य डॉ. विलासराव भांबुरकर, शाळा तपासणी अधिकारी उद्धव विखे, सुधीर बापू देशमुख, विदर्भ माध्यमिक संघाचे गणी शहा, तराळे सर आणि सुनील हिंगणकर यांनी शाल व श्रीफळ देऊन सावरकर यांचा गौरव केला.

त्यांच्या या निवडीबद्दल तालुक्यातील सर्व सन्माननीय आजीवन सदस्य, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त करत त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

# पुणे – खलील शेख आत्महत्या प्रकरणी माजी आमदार रवींद्र धंगेकर व पत्नी प्रतिभा धंगेकर अडचणीत

**दैनिक युवक आधार**

**ता. कर्जत - वैभव गायकवाड :** उत्कर्ष असोसिएट ही पुणे येथे एक फर्म आहे, त्याठिकाणी रवींद्र धंगेकर यांची पत्नी, बाळा शेडगे, रघू गौडा व यांची पत्नी भागीदार आहेत.

खलील शेख हे 2011 पासून पुण्यात बांधकामाचे कामे करत होते. ते घटनेतील आरोपीच्या येथे सेंट्रिंगचे काम करत होते. खलील शेखने या कामासाठी व्याजाने पैसे घेतले होते. आम्ही व्याजासहित पैसे दऊ, असे आश्वासन या सगळ्यांनी दिले होते. मात्र, यापैकी कोणीही पैसे न दिल्याने खलील शेख तणावात होते.

त्यांनी ज्या इमारतीमध्ये आत्महत्या केली त्याच्या बाहेरच्या बाजूला एक चिठ्ठी हस्तगत झाली होती. आणखी एक चिठ्ठी त्यांच्या खिशात सापडली होती. पोलिसांनी ही सदरची चिठ्ठी पाहिली आणि त्यानंतर खलील शेख यांचा मृतदेह ससून रुग्णालयात पाठवण्यात आला. यानंतर काल



संध्याकाळी खलील शेख यांच्या पत्नीने केलेल्या तक्रारीनुसार 14 जणांविरोधात फिर्याद नोंदवून घेण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी दिली होती.

रवींद्र धंगेकर आणि प्रतिभा धंगेकर हे सध्या अज्ञातस्थळी असून या दोघांनी अटकपूर्वक जामीन अर्ज मिळवण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. धंगेकर दाम्पत्याच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सोमवारी सुनावणी होणार आहे. मात्र, त्यापूर्वी पोलिसांनी अटक करु नये म्हणून सध्या रवींद्र धंगेकर आणि त्यांची पत्नी अज्ञातस्थळी गेले आहेत. दुसरीकडे धंगेकरांच्या शोधासाठी पुणे पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत. बांधकाम व्यावसायिक खलील शेख यांनी व्हिडिओ तयार करून गळफास घेत आत्महत्या केली होती.

यामध्ये त्यांनी रवींद्र धंगेकर, त्यांच्या पत्नी प्रतिभा धंगेकर, मनसेचे माजी नगरसेवक बाळा शेडगे, त्यांच्या पत्नी वर्षा शेडगे यांच्यासह अनेकांना आपल्या मृत्यूसाठी जबाबदार धरले होते.या प्रकरणामध्ये रवींद्र धंगेकर व त्यांची पत्नी प्रतिभा धंगेकर यांचा प्रामुख्याने उल्लेख आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत. मात्र शिवसेनेचे मुख्य नेते आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे या प्रकरणाकडे कसे पाहतात हे सुद्धा तितकेच महत्वाचे ठरेल.

# कलावंतांच्या विविध मागण्यांसाठी जनजागर संघटनेच्या वतीने भंडारा येथे संगीतमय आंदोलन २१ जुलै रोजी

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** -जनजागर कला साहित्य बहुउद्देशीय संस्था साकोली यांच्या वतीने दि.२१ जुलै २०२६ रोजी स. ११ वाजता त्रिमूर्ती चौक भंडारा येथे परमानंद मेश्राम सामाजिक चळवळीचे नेते यांच्या नेतृत्वात भव्य कलावंतांचे संगीतमय आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

या आंदोलनातील प्रमुख मागण्यामध्ये २०२५ -२६ मधील मानधन लाभार्थी निवड एक वर्ष होऊनही अद्याप कलावंत



निवड झालेली नाही ती तात्काळ करण्यात यावी,राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन समिती अध्यक्ष हे कलावंतांमधूनच असला पाहिजे,कलावंतांना आरोग्य विमा लागू करा, मानधन कलावंत निवड ही जिल्ह्यामधून किमान ५०० कलावंतांची निवड करावी,कलावंतांच्या गाडीला टोल नाका मोफत असायला पाहिजे, मानधन कलावंतांची वय ही ४५ वर्षे असावी, प्रत्येक तहसिल मधून निवड करतांना कलावंतांचा निकष ठरलेला असावा उदा. नाटक, वादक, पेंटर, तमाशा, गोंधळ, दंडार,भजन या क्षेत्रातील कलावंत किती निवडायचे हा निकष असला पाहिजे,प्रत्येक कला क्षेत्रातील नामांकित कलावंत/ राज्य स्तरीय, जिल्हा स्तरीय अशा कलावंतांची मानधन समितीवर निवड करावी, कलावंतांचं मानधन हे मासिक दहा हजार रुपये असायला पाहिजे या व इतर मागण्यांचा समावेश आहे. त्यासाठी संगीतमय आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व स्तरीय कलावंतांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन जनजागर संघटनेचे अध्यक्ष भावेश कोटांगले , भूमाला उईके जेष्ठ नाट्य कलावंत, उपाध्यक्ष उमेश भोयर, सचिव धनंजय धकाते, निलाराम बागडे, पुण्यशील कोचे, संदिप कोटांगले, गुड्डू बोरकर यांनी केले आहे.

# जंतरमंतरच्या आंदोलनाचे नवी मुंबईत पडसाद

**दैनिक युवकआधार**

**अमोल कांबळे ( ऐरोली प्रतिनिधी )** : दिल्लीतील जंतर मंतर येथील सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाचे पाडसाद संपूर्ण महाराष्ट्रसह नवी मुंबई मध्ये सुद्धा उमटताना दिसत आहेत.

प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, अभियंता व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी पेपरफुटी प्रकरणासह विविध जनहिताच्या मागण्यांसाठी शांततापूर्ण उपोषण सुरू केले होते. यावेळी त्यांना उपोषण स्थळावरून हटविण्यात आले असता आंदोलनास एक वेगळे वळण लागले आहे. याच्या निषेधार्थ नवी मुंबईतील ऐरोली दिवा सर्कल येथे सोमवार




दि. २०/०७/२०२६ रोजी, सकाळी १०.०० वा. नवी मुंबई युवा संघर्ष समिती, नवी मुंबई यांच्या माध्यमातून धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

# पिलीव जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी श्री .नाना मधुकर मदने यांचे निवडीबद्दल शुभेच्छांचा वर्षाव"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर** : माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी श्री नाना मधुकर मदने यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी सौ. अश्विनी अमित वगरे यांच्या बिनविरोध निवडी झाल्याबद्दल संग्रामराजे ग्रुपच्या वतीने त्याचप्रमाणे नरवीर उमाजी नाईक गणेश मंडळ व विविध संस्थांच्या व मंडळांच्या कडून त्याचप्रमाणे सोलापूर जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन समितीचे माजी सभापती श्री. संग्रामसिंह



जहागिरदार, पंचायत समितीचे माजी सदस्य शहाजी महाडिक व अनेक मान्यवरांच्या कडून त्यांच्यावरती शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. व त्यांच्या निवडीचे अनेक ठिकाणाहून कौतुक केले जात आहे.

# जिल्हास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत क्रीडा सह्याद्री, निफाडचे सुवर्णपदक (क्रीडा मार्गदर्शक विलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली संघाची उल्लेखनीय कामगिरी)

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व टेनिस क्रिकेट असोसिएशन, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय १७ वर्षांखालील अजिंक्यपद टेनिस क्रिकेट स्पर्धा दिंडोरी येथील पोलीस प्रशिक्षण केंद्र, उमराळे रोड येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत क्रीडा सह्याद्री, निफाड संघाने उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. या उल्लेखनीय यशाबद्दल संघाचे जिल्हाभरातून अभिनंदन होत आहे.

स्पर्धेचे उद्घाटन नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव विलास गायकवाड, दिंडोरी टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष संदीप बोरसे, क्रीडाशिक्षक प्रशांत आढाव, संकेत चंद्रमोरे, पृथ्वीराज वडगुळे, अनिकेत भवर, अक्षय चौधरी, सिद्धांत चंद्रमोरे, मुकेश सोनवणे, कीर्तिराज सर, राहुल तांबे, दीपक जाधव, वनिता शेळके मॅडम तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

या स्पर्धेत जिल्ह्यातील एकूण ११ संघांनी सहभाग नोंदवला. अंतिम सामना क्रीडा सह्याद्री, निफाड व के. के. वाघ युनिव्हर्सल स्कूल, निफाड यांच्यात रंगला. अत्यंत चुरशीच्या या सामन्यात क्रीडा सह्याद्री संघाने



सर्व विभागांत उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

विजेत्या संघातील दक्ष गायकवाड, प्रज्वल गाजरे, संस्कार सांगळे, कार्तिक गाजरे, साई जाधव, वेदांत शेजवळ, नूतन शर्मा, सक्षम गायकवाड, आदित्य आहेर, नकुल शिंदे, प्रज्योत शेजवळ, अथर्व सानप, हृदय राऊत, प्रेम पवार, अर्जुन महाजन, राम सोनवणे, ईशान नगरे, प्रीतम शिंदे, ऋतुराज आंधळे आणि सिद्धार्थ गाजरे या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक समन्वय, शिस्तबद्ध खेळ आणि जिद्दीच्या जोरावर संघाला सुवर्णपदक मिळवून दिले.

स्पर्धेतील सर्व विजेत्या संघांचे व खेळाडूंचे भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष कन्हैया गुजर, महासचिव सौ. मीनाक्षी गिरी, उपाध्यक्ष विलास गिरी, महिला अध्यक्षा धनश्री गिरी, महाराष्ट्र सदस्य दर्शन थोरात, सहसचिव धनंजय लोखंडे तसेच नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव व विभागीय अध्यक्ष विलास गायकवाड यांनी अभिनंदन करून आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

क्रीडा सह्याद्री, निफाड संघाच्या या यशामुळे निफाड तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, खेळाडूंच्या या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे

# एन शेषागिरी रावसर, व शिवानंद चौगुला यांनी श्री क्षेत्र आळंदी ते श्रीक्षेत्र पंढरपूर पदयात्रेने घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन"

**दैनिक युवक आधार पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर** : सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याचे चेअरमन एन शेषागिरी रावसर यांनी सालाबाद प्रमाणे चालू वर्षी सुद्धा आषाढी एकादशीचे औचित्य साधून श्रीक्षेत्र आळंदी ते पंढरपूर सर्व घटकांना सुखी संपन्न दीर्घायुष्य लाभण्यासाठी आणि सर्व शेतकरी बांधवांना सुख समृद्धी लाभण्यासाठी श्री क्षेत्र आळंदी ते पंढरपूर पदयात्रेचे आयोजन केले होते. त्यांच्यासोबत सोमा एंटरप्राईजेसचे शिवानंद चौगुला (बेळगाव) हेही सहभागी झाले होते. ज्ञानोबा तुकाराम यांच्या जयघोष यामध्ये आणि शेतकरी राजाला सुख समृद्धी लाभू दे यासाठी पदयात्रेतून प्रवास करत असताना जागोजागी त्यांचे अनेक शेतकरी बांधव त्याचप्रमाणे सद्गुरु परिवाराचे




सदस्य हे त्यांचा सन्मान करीत होते. माळशिरस तालुक्यात प्रवेश करतात सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब कर्नवर पाटील यांच्या परिवारातर्फे तर पंढरपूर तालुक्यात प्रवेश करताच सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याचे संचालक मोहनराव बागल व त्यांचे सहकारी त्याचप्रमाणे असंख्य सभासद बांधव व ग्रामस्थांनी या पदयात्रेच्या निमित्ताने त्यांचा सन्मान करून अशा प्रकारचा त्यांचा ध्येयवादी प्रवास अतिशय चांगल्या पद्धतीचा असून समाजाला दिशा देणारा आहे अशा प्रकारचे अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्रीक्षेत्र पंढरपूर येथून श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतल्यानंतर सद्गुरु श्री श्री साखर कारखान्यावरती त्यांचा सन्मान एच आर अँड एडमिन मॅनेजर सचिन खटके, कॅन मॅनेजर सुनील सावंत, सिविल इंजिनिअर अवधूत जमदाडे, शेती अधिकारी दत्ता क्षिरसागर,ॲग्री सुपरवायझर पिसे व सर्व खाते प्रमुख कर्मचारी बांधवांनी पुष्पहार श्रीफळ शाल देऊन केला. सदर पद यात्रेच्या संदर्भात सुनील सावंत यांनी गौरवोद्गार काढून सर्वांच्या वतीने समाधान व्यक्त केले.

# अमरावतीत गुन्हेगारीचा स्फोट;

## आमदार संजय खोडकेंचा पोलीस प्रशासनावर हल्लाबोल, १५ दिवसांचा अल्टिमेटम

**दैनिक युवक आधार अमरावती | प्रतिनिधी : ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : अमरावती शहरातील वाढती गुन्हेगारी, अवैध धंदे आणि कायदा-सुव्यवस्थेच्या बिघडलेल्या परिस्थितीवरून आमदार संजय खोडके यांनी पोलीस प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत त्यांनी शहरातील गंभीर परिस्थितीचा मुद्दा उपस्थित करत पोलीस विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पुढील १५ दिवसांत ठोस आणि परिणामकारक कारवाई झाली नाही, तर जनतेसह उपोषण आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

बैठकीत बोलताना आमदार खोडके म्हणाले की, अमरावती शहरात दिवसेंदिवस खून, लूटमार, मारहाण, घरफोडी, महिलांवरील अत्याचार, अवैध दारू, जुगार, मटका आणि अमली पदार्थांच्या विक्रीसारख्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण



झाले असून, नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

त्यांनी आरोप केला की, शहरातील अनेक भागांत अवैध व्यवसाय खुलेआम सुरू असून त्यावर प्रभावी कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढत असून कायद्याचा धाक कमी झाल्याचे चित्र आहे. पोलीस प्रशासनाने केवळ आकडेवारी सादर करण्याऐवजी प्रत्यक्ष परिणाम दिसतील अशी मोहीम राबवावी, अशी मागणी त्यांनी केली.

आमदार खोडके यांनी शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी विशेष पथके स्थापन करणे, अवैध धंद्यांवर सातत्याने धाडी टाकणे, रात्रीची गस्त वाढविणे आणि नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. नागरिकांना सुरक्षित वातावरण देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार खोडके यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेतली. अमरावतीतील कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावर पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठक घेण्यात येईल आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

दरम्यान, आमदार संजय खोडके यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा देत सांगितले की, पुढील १५ दिवसांत गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांवर प्रभावी कारवाई झाली नाही, तर जनतेच्या सुरक्षेसाठी लोकशाही मार्गाने उपोषण आंदोलन करण्यात येईल.

या भूमिकेमुळे अमरावतीतील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला असून, पोलीस प्रशासन पुढील काळात कोणती पावले उचलते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# हायड्रोजन ट्रेन्सबद्दल सविस्तर माहिती: त्या कशा काम करतात आणि पारंपरिक रेल्वेपेक्षा त्या अधिक स्वच्छ पर्याय का आहेत

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १७ जुलै २०२६ रोजी हरियाणाच्या जिंद रेल्वे स्थानकावरून भारताच्या पहिल्या स्वदेशी हायड्रोजन-शक्तीवर चालणाऱ्या 'नमो ग्रीन रेल' या रेल्वेच्या व्यावसायिक सेवेला हिरवा झेंडा दाखवला. भारतीय रेल्वेच्या माहितीनुसार, नव्याने उद्घाटन झालेली ही १० डब्यांची रेल्वे एकाच फेरीत सुमारे २,६०० प्रवाशांना घेऊन जाऊ शकते, ज्यामुळे ही जगातील सर्वात लांब हायड्रोजन-शक्तीवर चालणारी प्रवासी रेल्वे सेवा ठरली आहे.

ही ट्रेन 89 किमी लांबीच्या जिंद-सोनीपत मार्गावर चालते, जींद सिटी, पांडू पिंडारा, ललित खेरा, भांबेवा, ईशापूर खेरी, बुटाना, खंडराई, गोहाना, रबरा, लथ मोहन हरियाणा, बारवासनी आणि हरियाणातील सोनीपत यासह 12 प्रादेशिक रेल्वे स्थानकांवर थांबते.

या हायड्रोजन ट्रेनच्या उद्घाटनामुळे, भारत पारंपरिक कोळसा, डिझेल आणि इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हच्या जागी स्वच्छ ऊर्जा स्रोतांकडे वाटचाल करू इच्छित आहे. हे हायड्रोजन तंत्रज्ञान कसे कार्य करते आणि ते शाश्वत रेल्वेचे भविष्य का आहे, हे आपण अधिक सखोलपणे जाणून घेऊया.

**हायड्रोजनवर चालणाऱ्या रेल्वेगाड्या डिझेल, कोळसा आणि विजेवर चालणाऱ्या लोकोमोटिव्हपेक्षा कशा वेगळ्या आहेत?**

डिझेल आणि कोळशावर चालणाऱ्या रेल्वेगाड्या जीवाश्म इंधन जाळून चालतात, ज्यामुळे कार्बन डायऑक्साइड (CO2) आणि नायट्रोजन ऑक्साईड (NOx) सारखे हानिकारक वायू हवेत सोडले जातात. यामुळे प्रदूषण होते आणि जागतिक तापमानवाढीत भर पडते. याउलट, इलेक्ट्रिक रेल्वेगाड्या प्रदूषणाची समस्या सोडवतात, परंतु त्यासाठी संपूर्ण मार्गावर महागड्या ओव्हरहेड तारांची आवश्यकता असते, ज्यामुळे हे जाळे उभारणे आणि त्याची देखभाल करणे खूप खर्चिक ठरते.

हायड्रोजन ट्रेनमध्ये दोन्ही जगातील सर्वोत्तम गोष्टींचा संगम असतो. त्यामध्ये एक फ्युएल सेल बसवलेला असतो, जो हवेतील ऑक्सिजनसोबत हायड्रोजन मिसळून वीज निर्माण करतो. या अभिक्रियेतून फक्त शुद्ध पाण्याची वाफ आणि थोडी उष्णता हेच टाकाऊ पदार्थ बाहेर पडतात. याचा अर्थ, कोळसा किंवा डिझेल इंजिनच्या तुलनेत यात कोणताही धूर, हानिकारक वायू नसतो आणि आवाजही खूप कमी असतो. हायड्रोजन ट्रेनमध्ये स्वतःचा ऊर्जा स्रोत असल्यामुळे, तिला ओव्हरहेड इलेक्ट्रिक तारांची अजिबात गरज नसते, ज्यामुळे पायाभूत सुविधांवरील प्रचंड पैशांची बचत होते.

**हायड्रोजन ट्रेनमधील मुख्य घटक**

हायड्रोजन ट्रेनमध्ये पाच मुख्य घटक असतात: हायड्रोजन साठवण टाक्या, एक फ्युएल सेल प्रणाली, एक लिथियम-आयन बॅटरी पॅक, एक पॉवर इन्व्हर्टर आणि कन्व्हर्टर, आणि इलेक्ट्रिक ट्रॅक्शन मोटर्स. हायड्रोजन साठवण टाक्या ह्या उच्च-दाबाचे, मजबूत कार्बन-फायबर सिलेंडर असतात, ज्यात हायड्रोजन इंधन साठवलेले असते. प्रवाशांची जागा वाचवण्यासाठी आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, त्या एकतर ट्रेनच्या छतावर बसवलेल्या असतात किंवा एका विशेष पॉवर कारमध्ये ठेवलेल्या असतात.

इंधन सेल प्रणाली ट्रेनच्या अंतर्गत ऊर्जा प्रकल्पाचे काम करते. ती साठवलेल्या हायड्रोजनला बाहेरील हवेतील ऑक्सिजनसोबत एकत्र करते, ज्यामुळे एक विद्युत रासायनिक अभिक्रिया सुरू होते आणि त्यातून वीज, पाणी व उष्णता निर्माण होते.

लिथियम-आयन बॅटरी पॅक ऊर्जा साठवण आणि कमाल शक्तीचे व्यवस्थापन करते. ती अतिरिक्त वीज साठवते आणि ब्रेक लावताना निर्माण होणारी ऊर्जा (रिजनरेटिव्ह ब्रेकिंग) मिळवते, ज्यामुळे वेग वाढवताना अतिरिक्त शक्ती मिळते.

पॉवर इन्व्हर्टर आणि कन्व्हर्टर ही एक इलेक्ट्रॉनिक नियंत्रण प्रणाली आहे जी विजेच्या प्रवाहाचे व्यवस्थापन करते. ती विद्युत प्रवाहाचे योग्य व्होल्टेजमध्ये रूपांतर करते आणि फ्युएल सेल, बॅटरी व मोटर्स यांच्यामधील विजेच्या वितरणाचे नियमन करते.

ट्रेनच्या डब्यांच्या खाली असलेले इलेक्ट्रिक ट्रॅक्शन मोटर्स, ही नियंत्रित विद्युत ऊर्जा घेऊन तिचे यांत्रिक गतीमध्ये रूपांतर करतात, ज्यामुळे चाके फिरतात आणि ट्रेन पुढे सरकते.



**हायड्रोजन ट्रेन कशा चालतात?**

ज्या रेल्वेगाड्या ओव्हरहेड विद्युत तारांवर धावत नाहीत, त्यांच्यासाठी हायड्रोजन हा सर्वात स्वच्छ ऊर्जा पर्याय आहे. भारतीय रेल्वेने या गाड्यांना आधार देण्यासाठी विशेष स्थानके आणि आवश्यक उपकरणे उभारली आहेत. हायड्रोजन गाड्या त्यांच्या मुख्य घटकांचा वापर करून चार अखंड टप्प्यांमध्ये वीज निर्माण करतात. यामध्ये इंधन पोहोचवणे, रासायनिक अभिक्रिया सुरू करणे, विजेचे व्यवस्थापन करणे आणि गाडी चालवणे यांचा समावेश आहे.

दाबलेला हायड्रोजन वायू छतावरील किंवा खास पॉवर कारमधील हायड्रोजन साठवण टाक्यांमधून बाहेर पडून फ्युएल सेल सिस्टीममध्ये प्रवेश करतो. त्याच वेळी, बाहेरील हवेतील ऑक्सिजन प्रोटॉन एक्सचेंज मेम्ब्रेन फ्युएल सेलमध्ये (PEMFC) प्रवेश करतो, जो कोणत्याही हायड्रोजन ट्रेनचा आत्मा असतो.

फ्युएल सेल सिस्टीममध्ये, हायड्रोजन आणि ऑक्सिजन एकत्र येतात आणि त्यांच्यात एक इलेक्ट्रोकेमिकल अभिक्रिया घडते, ज्यामुळे हायड्रोजन वायूमधून इलेक्ट्रॉन्स वेगळे होतात आणि विजेचा एक स्थिर प्रवाह निर्माण होतो. ही मूळ वीज पॉवर इन्व्हर्टर आणि कन्व्हर्टर सिस्टीममध्ये जाते, जी विद्युत प्रवाहाचे नियमन करते, त्यातील काही भाग ट्रेनला त्वरित ऊर्जा देण्यासाठी पाठवते आणि कोणतीही अतिरिक्त वीज नंतरच्या वापरासाठी लिथियम-आयन बॅटरी पॅकमध्ये वळवते.

पॉवर इन्व्हर्टर आणि कन्व्हर्टर प्रणाली नियंत्रित वीज थेट ट्रेनच्या खाली असलेल्या इलेक्ट्रिक ट्रॅक्शन मोटर्सकडे पाठवते. या मोटर्स या ऊर्जेचा वापर चाके फिरवण्यासाठी आणि ट्रेनला पुढे नेण्यासाठी करतात.

स्वच्छ ऊर्जा स्रोत असण्यासोबतच, हायड्रोजनमध्ये प्रचंड ऊर्जा देखील साठलेली असते. एक किलोग्राम हायड्रोजनमधून १२० मेगाजूल ऊर्जा मिळते, तर एक किलोग्राम डिझेलमधून केवळ ४३ मेगाजूल ऊर्जा मिळते.

मात्र, विजेचे हायड्रोजन इंधनात रूपांतर करणे आणि नंतर त्याचे पुन्हा विजेमध्ये रूपांतर करणे या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात ऊर्जेचा अपव्यय होतो. हायड्रोजनची एकूण कार्यक्षमता ३० टक्क्यांपेक्षा किंचित कमी आहे, जी साधारणपणे पारंपरिक डिझेल ट्रेनइतकीच आहे, परंतु थेट ओव्हरहेड वायरला जोडल्या जाणाऱ्या प्रमाणित इलेक्ट्रिक ट्रेन्सपेक्षा कमी आहे.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे हे इंधन सेल अधिक हलके आणि देखभालीस सोपे झाले असल्याने, हायड्रोजन भविष्यातील प्रवासासाठी एक शक्तिशाली, शून्य-प्रदूषण पर्याय म्हणून उभा आहे.

**हायड्रोजन ट्रेनचे फायदे आणि तोटे**

इतर कोणत्याही तंत्रज्ञानाप्रमाणे, हायड्रोजन ट्रेनचीही स्वतःची बलस्थाने आणि मर्यादा आहेत:

**फायदे**

हानिकारक धूर नाही: जेव्हा इंधन सेलमध्ये हायड्रोजन वापरला जातो, तेव्हा त्यातून फक्त पाण्याची वाफ आणि गरम हवा बाहेर पडते. ते चालू असताना कोणतेही हरितगृह वायू किंवा धुरके निर्माण करणारे प्रदूषक बाहेर पडत नाहीत.

अत्यंत कार्यक्षम: हायड्रोजन फ्युएल सेल वाहने सामान्य पेट्रोल किंवा डिझेल इंजिनांपेक्षा दोन ते तीन पटीने अधिक कार्यक्षमतेने ऊर्जेचा वापर करतात.

जलद इंधन भरणे आणि जास्त पल्ला: बॅटरीवर चालणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांना चार्ज होण्यासाठी तास लागू शकतात, याउलट हायड्रोजन वाहनांमध्ये पाच मिनिटांपेक्षा कमी वेळात इंधन भरता येते आणि ती एका टाकीवर ४८२.८० किमी (३०० मैल) पेक्षा जास्त प्रवास करू शकतात.

लवचिक आणि सुरक्षित ऊर्जा स्रोत: हायड्रोजनचे उत्पादन पाणी, नैसर्गिक वायू, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि बायोमास यांसारख्या अनेक वेगवेगळ्या स्रोतांपासून केले जाऊ शकते. यामुळे आयात केलेल्या इंधनावरील अवलंबित्व कमी होते.

कमी देखभाल: हायड्रोजन वाहने इलेक्ट्रिक मोटर्सवर चालत असल्यामुळे, पेट्रोल वाहनांच्या तुलनेत त्यांमध्ये हलणारे भाग खूपच कमी असतात. याचा अर्थ द्रवपदार्थ कमी वेळा बदलावे लागतात आणि एकूण देखभालही कमी लागते.

**तोटे**

साठवणुकीतील अडचणी: पेट्रोलच्या तुलनेत हायड्रोजनमध्ये आकारमानानुसार कमी ऊर्जा सामावते. गाडी चालवण्यासाठी पुरेशी ऊर्जा साठवण्यासाठी, त्याला खूप उच्च दाबाखाली संकुचित करावे लागते, ज्यामुळे टाक्या मोठ्या, जड आणि अधिक गुंतागुंतीच्या असाव्या लागतात.

उत्पादन आणि पायाभूत सुविधांची उभारणी खर्चिक: सध्या इंधन पेशी (फ्यूल सेल्स) स्वतः बनवणे खर्चिक आहे. त्याशिवाय, हायड्रोजन इंधन भरण्याची केंद्रे (हायड्रोजन रिफ्यूलिंग स्टेशन्स) उभारण्यासाठी आणि चालवण्यासाठी मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता असते, ज्यामुळे ग्राहकांसाठी एकूण खर्च जास्त राहतो.

मर्यादित इंधन भरण्याची केंद्रे: हायड्रोजन इंधन भरण्याची केंद्रे अजूनही खूप दुर्मिळ आहेत, ज्यामुळे त्याचा व्यापक सार्वजनिक वापर करणे अवघड होते.

उत्पादनादरम्यान होणारे उत्सर्जन: हायड्रोजन वाहने चालू असताना कोणतेही उत्सर्जन करत नसली तरी, पर्यावरणावरील परिणाम हा हायड्रोजन कसा तयार केला जातो यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतो. आज बहुतेक हायड्रोजन नैसर्गिक वायूपासून 'स्टीम मिथेन रिफॉर्मिंग' नावाच्या प्रक्रियेद्वारे तयार केला जातो, आणि कार्बन कॅप्चर तंत्रज्ञानासोबत याचा वापर केल्याशिवाय या प्रक्रियेतूनही कार्बन उत्सर्जन होते.

**हायड्रोजन ट्रेन असलेले देश**

जर्मनी, फ्रान्स, जपान, चीन आणि अमेरिका यांच्या पंक्तीत सामील होत, व्यावसायिकरित्या हायड्रोजनवर चालणाऱ्या रेल्वेगाड्या चालवणारा भारत हा सहावा देश आहे.

**जर्मनी**

व्यावसायिकरित्या हायड्रोजन ट्रेन चालवणारा जर्मनी हा जगातील पहिला देश होता. 'कोराडिया आयलिंट' असे नाव असलेली ही ट्रेन २०१८ मध्ये सेवेत दाखल झाली. स्वच्छ आणि शाश्वत रेल्वे तंत्रज्ञानामध्ये विशेषज्ञ असलेल्या 'अल्स्टॉम' या फ्रेंच कंपनीने तिची निर्मिती केली होती.

कोराडिया आयलिंट ही एक कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक अशी डिझाइन केलेली लो-फ्लोअर ट्रेन आहे. तिचा फ्युएल सेल आणि हायड्रोजन टाकी छतावर बसवलेली आहे, तर मोटर, कन्व्हर्टर्स आणि बॅटरी खाली बसवलेली आहेत. ही ट्रेन १५० बसलेल्या आणि १५० उभ्या प्रवाशांना घेऊन जाऊ शकते, आणि एकदा इंधन भरल्यावर ताशी १४० किमी वेगापर्यंत १,००० किमी पर्यंतचा प्रवास करू शकते.

**फ्रान्स**

जर्मनीच्या पावलावर पाऊल ठेवत फ्रान्सनेही हायड्रोजन रेल्वे तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. अल्स्टॉमची कोराडिया आयलिंट सप्टेंबर २०२१ मध्ये फ्रान्सच्या रेल्वेमार्गांवर प्रथम धावली, आणि हायड्रोजन ट्रेन नियमित वापरात आणण्याच्या देशाच्या योजनांचा भाग म्हणून २०२२ मध्ये टूर्स-लोशे मार्गावर तिची पुढील चाचणी घेण्यात आली.

**जपान**

जपानने स्वतःची हायड्रोजन-हायब्रीड ट्रेन तयार केली आहे, जिला 'हायड्रोजन-हायब्रीड ॲडव्हान्स्ड रेल व्हेईकल फॉर इनोव्हेशन' (HYBARI) असे म्हणतात. २०२२ पासून ताचिकावा आणि कावासाकीला जोडणाऱ्या मार्गांवर तिची चाचणी सुरू आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये ही ट्रेन जनतेसमोर सादर करण्यात आली आणि पुढच्याच महिन्यात तिची चाचणी सुरू झाली. २०२३ पर्यंत HYBARI ला नियमित प्रवासी सेवेत आणण्याचे जपानचे उद्दिष्ट आहे.

**युनायटेड स्टेट्स**

अमेरिकेने २०२४ मध्ये आपल्या झिरो एमिशन मल्टिपल युनिट (ZEMU) प्रवासी ट्रेनसह हायड्रोजन ट्रेन चालवणाऱ्या देशांच्या यादीत प्रवेश केला, जी सॅन बर्नार्डिनोमधील ॲरो लाईन मार्गावर धावते.

**चीन**

चीनने मे २०२५ मध्ये व्यावसायिक वापरासाठी आपले पहिले हायड्रोजनवर चालणारे लोकोमोटिव्ह सादर केले. याचा उपयोग गुइझोउ प्रांतातील एका रेल्वे स्थानकावर शंटिंगसाठी, म्हणजेच डबे इकडून तिकडे हलवण्यासाठी केला जातो.

हे लोकोमोटिव्ह एकदा हायड्रोजन भरल्यावर सुमारे १४० ते १५० किलोमीटरचा प्रवास करू शकते आणि ४,५०० टनांपेक्षा जास्त भार ओढू शकते, त्यामुळे ते कोळसा वाहून नेण्याच्या लहान अंतराच्या प्रवासासाठी अत्यंत योग्य आहे. यात सुमारे १५ मिनिटांत इंधन भरता येते आणि ते जवळच्याच एका प्लांटमधून थेट हायड्रोजन मिळवते, ज्यामुळे या इंधनाचे उत्पादन स्वस्त होते.

ऑक्टोबर २०२५ मध्ये, चीनने चांगचुन येथे 'चिंगचुन' नावाची आपली पहिली हायड्रोजनवर चालणारी पर्यटक ट्रेन देखील सादर केली. सीआरआरसी चांगचुनने बांधलेली ही ट्रेन पूर्णपणे हायड्रोजनवर चालते, शून्य उत्सर्जन करते आणि तिला ओव्हरहेड पॉवर लाईन्सची आवश्यकता नाही. या प्रदेशातील कडाक्याच्या थंडीचा सामना करण्यासाठी तिची विशेष रचना करण्यात आली आहे आणि ती एक ते सहा डब्यांमध्ये तयार केली जाऊ शकते, ज्यामुळे ती दैनंदिन प्रवासासाठी आणि पर्यटन सहलींसाठी दोन्हीसाठी योग्य ठरते.